रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १०८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

पनवेल महापालिकेकडून हरित क्षेत्र उभारणी/३
रायगडात शेतकऱ्यांकडील पशुधनाच्या संख्येत घट/५
आयसीसी वर्ल्डकप टीममध्ये भारताच्या तीन खेळाडू/८

## महाराष्ट्रात रहिवासी क्षेत्रासाठी तुकडेबंदी कायदा रद्द



**मुंबई :** राज्यातील नागरी भागातील तसेच प्रादेशिक योजनांमधील बिगरशेती वापर अनुज्ञेय क्षेत्रावरील जमिनींसाठी तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत राज शासनाने नुकताच एक अध्यादेश जारी केला असून या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५पासून तुकडेबंदी कायद्यामुळे अडकलेली घरे आणि प्लॉट कायदेशीर करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात पत्रकार परिषदेत दिली. या निर्णयासंदर्भात अधिक माहिती देताना मंत्री बावनकुळे म्हणाले, या अध्यादेशानुसार १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अशा तुकड्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांना आता कोणतेही शुल्क न आकारता नियमित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाचा राज्यातील ४९ लाख परिवारांना लाभ होणार आहे.

# राज्यात नगरपालिका निवडणुकांचा शंखनाद!

### २४६ नगर परिषदा, ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबरला मतदान



**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २ डिसेंबर रोजी मतदान, तर ३ डिसेंबरला मतमोजणी होईल. या सर्व निवडणुका ईव्हीएमवर होणार असल्याचे राज्य मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी (दि.४) पत्रकार परिषदेत जाहीर केले.

याबाबत माहिती देताना निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी सांगितले की, २४६ नगर परिषदा, ४२ नगरपंचायतीच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाकडून घेण्यात येत आहे. ६८५९ सदस्य यातून निवडून येणार आहे. १४७ नगरपंचायती आहेत. त्यापैकी ४२ नगरपंचायतीसाठी निवडणूक होत आहे. सर्व उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन स्वीकारले जातील.

**असा आहे कार्यक्रम**

- **अर्ज दाखल करण्यास सुरुवात : १० नोव्हेंबर**
- **अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत : १७ नोव्हेंबर**
- **अर्जांची छाननी : १८ नोव्हेंबर**
- **अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत : २१ नोव्हेंबर**
- **आक्षेप असलेल्या ठिकाणी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत : २५ नोव्हेंबर**
- **निवडणूक चिन्ह व उमेदवारांची अंतिम यादी : २६ नोव्हेंबर**
- **मतदान : २ डिसेंबर**
- **मतमोजणी : ३ डिसेंबर**

**दुबार मतदारांसाठी नवीन मोहीम**

मतदारांना मतदान केंद्र आणि नाव शोधण्यासाठी खास ॲप बनवण्यात आले आहे तसेच दुबार मतदारांपर्यंत राज्य निवडणूक आयोगाचे कर्मचारी पोहचतील. दुबार मतदारांसमोर डबल स्टार करण्यात आलेले आहेत. असा मतदार हा केंद्रावर आल्यानंतर त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घेतले जाईल. त्याला एकाच केंद्रावर मतदान करता येईल.

*नगरपंचायत आणि नगर परिषद निवडणुकांच्या संदर्भातील मतदार यादी ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाली आहे, तर मतदार केंद्रनिहाय मतदार याद्या ७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहेत. या निवडणुकांसाठी एकूण एक कोटी तीन हजार ५७६ मतदार असून मतदानासाठी एकूण १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व पुरेशा ईव्हीएमची व्यवस्था करण्यात आली आहे.*

**-दिनेश वाघमारे,**
**मुख्य राज्य निवडणूक आयुक्त**

# महायुती सरकारचा धडाका | *राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत २१ निर्णय*

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि. ४) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत २१ निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. याशिवायही इतर महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली आहे.**



### विश्वचषक विजेत्या भारतीय महिला संघाचे अभिनंदन

आयसीसी महिला विश्वचषकावर पहिल्यांदाच भारताचे नाव कोरणाऱ्या भारतीय संघाचे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अभिनंदन करण्यात आले. याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, व अजित पवार यांनी भारतीय संघाच्या या घवघवीत यशाबाबत गौरवोद्गार काढले. भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मानधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव यांना या ऐतिहासिक विजयातील भागीदारीसाठी रोख पारितोषिकाने गौरवान्वित करण्याचा निर्णयदेखील या बैठकीत मंजूर करण्यात आला.

### जनआरोग्य योजनेत २४०० आजारांचा समावेश, मर्यादा पाच लाखांवरून थेट १० लाखांवर!

मंत्रिमंडळ निर्णयांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेला निर्णय सर्वात महत्त्वाचा आणि मोठा ठरला. सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना या निर्णयाची माहिती दिली.

या योजनेत आता विविध प्रकारच्या तब्बल २४०० आजारांसाठी उपचारांना मान्यता देण्यात आली आहे. यापैकी २३९९ आजारांसाठी राज्यातील नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार उपलब्ध होणार आहेत तसेच ज्या काही गंभीर आजारांसाठी अधिकचा खर्च होत आहे. त्यासाठी १० लाख रुपयांपर्यंत मदत देण्याचा निर्णयही शासनाने घेतल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. हा निर्णय राज्याच्या आरोग्य क्षेत्रातील एक ऐतिहासिक पाऊल मानला जात आहे, ज्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### विरार-अलिबाग कॉरिडोर भूसंपादनाच्या कर्जास शासन हमी

विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिकेच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला हुडकोकडून घ्याव्या लागणाऱ्या दोन हजार कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

या निर्णयानुसार विरार ते अलिबाग मार्गासाठीच्या भूसंपादनासाठी हुडकोचे दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात येणार आहे. यामध्ये उभारण्यात येणाऱ्या कर्जास शासनाने हमी दिली आहे तसेच यापूर्वीच्या हुडकोमार्फत निधी उभारण्यासाठीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे विरार ते अलिबाग मार्गाच्या भूसंपादनाचा प्रश्न सुटून या मार्गाचे काम लवकरच सुरू होणार आहे. ही बहुउद्देशीय मार्गिका १२६.०६ किमी लांबीची असेल. त्यापैकी मौजे नवघर (जि.पालघर) ते मौजे बळवली (ता.पेण) असे ९६.४१० किमीचे पहिल्या टप्प्यातील काम बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### मच्छीमारांना कर्जावर चार टक्के व्याज सवलत

राज्यातील मच्छीमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादकांसह किसान क्रेडिट कार्डधारक मत्स्यव्यावसायिकांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या खेळत्या भांडवली कर्जावर चार टक्के व्याज परतावा सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आली. या निर्णयामुळे हजारो मच्छीमार कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. ताजे मासे उत्पादन, संवर्धन आणि साठवण व्यवस्थापनाला यामुळे बळकटी मिळणार आहे.

या योजनेचा लाभ मच्छीमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन करणारे, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्यबोटुकली संवर्धन करणारे तसेच पोस्ट हार्वेस्टिंग टप्प्यात वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्टन आणि साठवणूक करणाऱ्यांना मिळणार आहे. घेतलेले अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्ज हे उचल केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत परतफेड करावे लागणार आहे. व्याज परताव्याची प्रक्रिया सहकार विभाग व संबंधित बँकांच्या माध्यमातून केली जाणार आहे. शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने पीककर्ज मिळते, त्याच धर्तीवर मच्छीमारांना हे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. राष्ट्रीयकृत, खासगी, ग्रामीण आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या योजनेत सहभागी राहतील.

या योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



**महाड : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा ६९वा वर्धापन दिन सोमवारी क्रांतिभूमीत झाला. या कार्यक्रमासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले महाड नगरीत आले होते. त्यांची माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, बिपीन म्हामुणकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, प्रशांत मोरबाळे आदी उपस्थित होते.**

## ॲपद्वारे जुगार खेळणाऱ्या टोळीवर रोह्यात पोलिसांची कारवाई

### ३५ जणांवर गुन्हा दाखल; प्रमुख आरोपी गजाआड

**धाटाव : प्रतिनिधी**

मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाइन गेमिंगद्वारे जुगार खेळणाऱ्या टोळीवर अलिबाग स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ३५ जणांवर गुन्हा दाखल केला असून मुद्देमाल जप्त केला आहे.



एलसीबीचे पोलीस शिपाई मोरेश्वर उमले यांना आरोपी नितेश मधुकर सानप (रा. संभे) हा रोहा-अष्टमी मार्गावरील आडोशाला लोकांकडून ऑनलाईन पैसे स्वीकारून फनगेम आणि फनरेप या मोबाईल ॲप्सच्या माध्यमातून जुगार चालवत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने तातडीने कारवाई केली आणि तालुक्यात विविध ठिकाणी छापे टाकून जुगाराचा मोठा प्रकार उघडकीस आणला.

प्रमुख आरोपी नितेश सानप याच्यासह शिल्पेश अनिल पोवाळे (रा. अलिबाग), शिवाजी पवार (रा. भुवनेश्वर, रोहा) व अन्य असे एकूण ३५ आरोपी या ऑनलाइन जुगार नेटवर्कमध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपींकडून एक मोबाईल आणि ३,१८० रोख रक्कम असा एकूण १८,१८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे तसेच एलसीबीचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या देखरेखीखाली ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी २००३/२०२५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमानुसार १८८७चे कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपासात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याची शक्यता असून त्या दृष्टीने पुढील तपास सुरू आहे.

## बिहारमध्ये पुन्हा एनडीए सत्तेवर येणार

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पहिला टप्पा ६ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. १२१ जागांसाठी या टप्प्यात मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्याचा प्रचार आता संपला आहे, ज्यानंतर ओपिनियन पोल समोर आले आहेत. यात पुन्हा एकदा एनडीए सरकार बिहारमध्ये स्थापन होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे तसेच बिहारमध्ये भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरेल, असाही दावा यामध्ये करण्यात आला आहे.

**भाजपला सर्वाधिक जागा मिळण्याचा सर्व्हेत अंदाज**

आयएनएस-मॅटराइज सर्व्हेच्या आकडेवारीनुसार भाजपला ८३ ते ८७ एवढ्या जागा मिळण्याचा अंदाज आहे. याचबरोबर नितीशकुमार यांच्या जनता दल (युनायटेड)ला ६१ ते ६५ जागा मिळण्याची शक्यता आहे. अशा पद्धतीने एनडीएला एकूण १५३ ते १६४ एवढ्या जागा मिळू शकतात, तर मतांचा टक्का जवळपास ४९ टक्क्यांपर्यंत पोहचेल. दुसरीकडे महागठबंधनला केवळ ७६ ते ८७ जागाच मिळण्याची शक्यता आहे.

## ईश्वरपूर नावाबाबत शासनाची अधिसूचना जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

सांगली तालुक्यातील इस्लामपूरचे नाव आता ईश्वरपूर झाले आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने मंगळवारी (दि. ४) राजपत्र जारी करून निर्णय जाहीर केला. त्यानुसार इस्लामपूर शहर व नगर परिषदेचे नाव अधिकृतरित्या ईश्वरपूर असे करण्यात आले आहे.

गाव किंवा शहरांची नावे बदलण्याबाबतचा विषय हा केंद्र शासनाच्या अखत्यारीत येतो. सांगली जिल्ह्याच्या वाळवा तालुक्यातील इस्लामपूर या शहराचे नाव बदलून ईश्वरपूर असे करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या शिफारशीसह केंद्र शासनाला सादर करण्यात आला होता. त्यास केंद्राने मान्यता दिल्यानंतर राज्य शासनाने परिपत्रक जारी करून हा निर्णय जाहीर केला आहे.

## 'माथेरानची राणी' अखेर उद्यापासून पर्यटकांच्या दिमतीला



**नेरळ : प्रतिनिधी**

मे महिन्यापासून बंद असलेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन तब्बल सात महिन्यांच्या विश्रांतीनंतर अखेर ६ नोव्हेंबरपासून पुन्हा धावणार आहे. या संदर्भात मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

मे महिन्यात अवकाळी आणि नंतर जोरदार पावसामुळे दरडी कोसळल्या, झाडे पडली आणि ट्रॅकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे २५ मेपासून मिनीट्रेनसेवा सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आली होती.

दरवर्षी दसऱ्यानंतर म्हणजे १५ ऑक्टोबरच्या सुमारास मिनीट्रेन धावते, मात्र यंदा पावसाचा मुक्काम वाढल्याने पारंपरिक मुहूर्त हुकला. रेल्वे विभागाने या २१ किमी नॅरोगेज मार्गाची दुरूस्ती पूर्ण केली असून सेवा ६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. माथेरानच्या डोंगरदऱ्यांमध्ये पुन्हा एकदा मिनीट्रेनची शीळ गुंजणार असल्याने पर्यटक व स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

**मिनीट्रेनचे वेळापत्रक**

**नेरळ ते माथेरान**
- सकाळी ८.५० वा. सुटेल व ११.३० वा. पोहचेल
- सकाळी १०.२५ वा. सुटेल व दुपारी १.०५ वा. पोहचेल

**माथेरान ते नेरळ**
- दुपारी २.४५ वा. सुटेल व सायं. ५.३० वा. पोहचेल
- दुपारी ४ वा. सुटेल व सायं. ६.४० वा. पोहचेल



# रायगडात कुष्ठरोग शोधमोहीम अभियान

## २३ लाख ३० हजार ८७१ लोकसंख्यंचे होणार सर्वेक्षण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोधमोहीम अभियान राबविण्यात येणार असून २०२७पर्यंत जिल्हयात कुष्ठरोग्याची संख्या शून्यावर आणण्यासाठी अर्थात शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासन काम करीत आहे.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण पाच लाख सहा हजार ८४१ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण २३ लाख ३० हजार ८७१ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तरी या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करुन होणारा प्रसार कमी करणे, समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे. सन २०२७पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतूमुळे त्वचेवर, नास्तवर आणि शरीराच्या नसा इतर अवयवावर परिणाम होतो.

शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट लालसर न खाजणारा बधीर चट्टा-डाग, त्या ठिकाणी घाम न येणे, जाड बधीर तेलकट त्वचा, त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्णपणे बंद करता न येणे, हातातून वस्तू गळून पडणे, चालताना पायातून चप्पल निसटणे, हाताची व पायाची बोटे वाकडे असणे, हात मानेपासून पाय घोट्यापासून लुळा पडणे.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण पाच लाख सहा हजार ८४१ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण २३ लाख ३० हजार ८७१ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी एकूण एक हजार ९९५ पथके व ३७५ पर्यवेक्षवा यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये ३९० कुष्ठरुग्ण औषधोपचाराखाली आहे.


# पालिका निवडणुकांसाठी तयारी

## रायगडात राजकीय हालचालींना वेग

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य निवडणुक आयोगाने नगरपालिका निवडणूक कार्यक्रम जारी केल्यामुळे रायगड जिल्ह्यातील १० नगरपालिकामध्ये आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. नगरपरिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.

२०२१मध्ये या नगरपालिकांचा कार्यकाळ संपला होता, मात्र गेली तीन वर्ष निवडणूका होऊ शकल्या नव्हत्या, त्यामुळे या सर्व नगरपालिकांवर प्रशासक राज कार्यरत होते. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी २०२६ पूर्वी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले



होते. त्यानुसार राज्य निवडणुक आयोगाने आज कोकणातील २७ नगरपालिकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

रायगड जिल्ह्यातील खोपोली, कर्जत, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन, उरण या नगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत. जिल्ह्यात १० नगर पालिकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होईल. ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल. समावेश आहे.

निवडणुक कार्यक्रम जाहीर झाल्याने राजकीय रणधुमाळीचा बिगूल वाजला आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या हालचाली वाढल्या आहेत.

पक्षांनी उमेदवार निश्चितीचे काम सुरू केले आहे. युत्या आणि आघाड्यांची समिकरणे जुळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. नगराध्यक्ष आरक्षण आणि प्रभाग आरक्षण यापुर्वीच निश्चित झाल्याने राजकीय पक्षांनी उमेदवार निश्चितीचे काम सुरू केले आहे. जिल्ह्यात युती आणि आघाडी करून निवडणूकांना सामोरे जाण्यावर राजकीय पक्षांचा भर असणार आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षा वेळापत्रक जाहीर

## पनवेल शहरात एकूण सहा केंद्र; दोन सत्रामध्ये पेपर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत २३ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षक पात्रता परिक्षा जिल्ह्यातील सहा केंद्रावर घेण्यात येणार असून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आयोजन व सनियंत्रण समिती, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा-२०२५ किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आयोजन व सनियंत्रण समिती, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा-२०२५ बैठक (दि.३० ऑक्टोबर २०२५) रोजी झाली.

या समितीच्या सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथ), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग श्रीमती ललिता दहितुले यांनी परिक्षेची बैठक व्यवस्था पोलिस बंदोबस्त,कस्टडी रुम (प्रश्न पत्रिका, उत्तर पत्रिका व स्वाक्षरीपट ठेवण्यासाठी), जिल्हा नियंत्रण कक्ष, परीक्षा केंद्र, अधिकारी/कर्मचारी नेमणूका, वाहन व्यवस्था, व्हिडीओ चित्रीकरण, भरारी पथक याबाबत माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आयोजन व सनियंत्रण समिती यांनी या परिक्षेचे आयोजन व संनियंत्रण करताना सर्व यंत्राणांनी अतिशय दक्षतेने काम करणेबाबत सूचना दिल्या.

ही परीक्षा पनवेल शहरातील एकूण ६ केंद्रांवर घेण्यात येणार असून, परीक्षा दि.२३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळ सत्र पेपर १ - १०.३० ते दु. १.०० या वेळेत व दुपार सत्र पेपर २ - दु.२.३० ते ५.०० या कालावधीत होणार आहेत.

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माध्यमिक, सेक्टर १ ई, सिडको कॉलनी, कळंबोली मॅकडोनाल्डच्या पाठीमागे, पनवेल येथे सकाळ सत्र स. १०.३० ते दु. १.०० या कालावधीत पेपर -१ साठी ८७२ परिक्षार्थी व दुपार सत्र दु.२.३० ते ५.०० या कालावधीत पेपर -II साठी ८७२ परिक्षार्थी

चांगू काना ठाकूर विद्यालय, जनार्दन भगत मार्ग प्लॉट न.८ सेक्टर-१४, सिडको कॉलनी, नवीन पनवेल येथे पेपर -१ साठी ५४६ परिक्षार्थी व दुपार सत्र दु.२.३० ते ५.०० या कालावधीत पेपर -११ साठी ५४६ परिक्षार्थी.

के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालय, सेक्टर १८, सिडको कॉलनी, नवीन पनवेल येथे सकाळ सत्र स.१०.३० ते दु.१.०० या कालावधीत पेपर साठी ८४० परिक्षार्थी व दुपारसत्र दु.२.३० ते ५.०० या कालावधीत पेपर -११ साठी ८३० परिक्षार्थी.

सेंट जोसेफ माध्यमिक विद्यालय, प्लॉट नं. ९, सेक्टर ७, नवीन पनवेल (पू) येथे सकाळ सत्र स.१०.३० ते दु.१.०० या कालावधीत पेपर १ साठी २५७ परिक्षार्थी व दुपारसत्र दु.२.३० ते ५.०० या कालावधीत पेपर -II साठी ४८० परिक्षार्थी.

को.ए.सो. के.व्हि. कन्या विद्यालय व ज्युनियर कॉलेज, सावरकर चौक, वडाळे तलाव, जुने पनवेल येथे दुपारसत्र दु.२.३० ते ५.०० या कालावधीत पेपर -खख साठी ४२६ परिक्षार्थी.

को.ए.सो. व्हि. के. विद्यालय, वडाळे तलाव, जुने पनवेल येथे दुपारसत्र दु.२.३० ते ५.०० या कालावधीत पेपर -११ साठी ३०५ परिक्षार्थी परिक्षार्थी परिक्षा देणार आहेत.

# तुर्भे येथे नऊ दिव्यांग स्टॉलला लागली आग



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने तुर्भे येथे दिव्यांगाना दिलेल्या नऊ स्टॉलला सोमवारी रात्री आग लागली. या आगीचे कारण अद्याप समोर आले नाही. वाशी अग्निशमनदलाला रात्री दीड वाजता याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन दीड तासात आग विझवली.

नवी मुंबई महापालिकेने दिव्यांग सन्मान योजने अंतर्गत शहरात ३०० हून अधिक स्टॉलचे वाटप केले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून विविध कारणांमुळे ही योजना वादात आहे. अनेकदा दिव्यांगांना दिलेल्या स्टॉलची जागा त्यांना मान्य नाही, तर काही ठिकाणी स्टॉलच्या जागेवर अतिक्रमण केले होते. अनेकांना अंतर्गत रस्त्यावर स्टॉल दिल्याने येथे ग्राहक येत नसल्याने त्यांनी ते ताब्यात घेतले नाही. ज्यांनी स्टॉल ताब्यात घेतले आहे, ते स्टॉल दुसऱ्यांना चालवण्यासाठी देणार असल्याने अद्याप पडून आहेत. तसेच अनेकांनी स्टॉल भाड्याने दिले आहेत.

अशाच प्रकारे तुर्भे सिडको उड्डाणपूल ते तुर्भे रेल्वे स्थानक या परिसरात२० हून अधिक जणांना स्टॉल देण्यात आले आहेत. यातील ९ स्टॉलला सोमवारी रात्री आग लागली होती.

# खासगी आस्थापनांमध्ये तक्रार समिती बंधनकारक

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०13 मधील प्रकरण क्र. ०१ मधील कलम-२ मधील व्याख्येनुसार खासगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती गठीत करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

ज्या आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश असेल अशा प्रत्येक नियोक्त्याने त्यांच्या आस्थापनामध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करुन अंतर्गत तक्रार समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची कार्यालय प्रमुखांनी नियुक्ती करावयाची आहे. तसेच समिती गठीत केल्याचे सूचनाफलक कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्यात यावा. या अंतर्गत तक्रार समिती गठीत झाल्याचे दिनांकापासून पुढील ३ वर्षांनी पुनर्गठीत करावयाची आहे. आपल्या कार्यालयात व आपल्या अधिनस्त कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करुन समिती गठीत केल्याचा आदेश जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयास wcdora@gmail.com या ईमेलवर सादर करावा.

# भाजप नेते वैकुंठ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**नागोठणे : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा महामंत्री तथा माजी जिल्हा परिषद विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांच्या वाढदिवस नागोठणे शहरात विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला.



जोगेश्वरी मंदिर परिसरात वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच डॉ. कोकणे हॉस्पिटल येथील रुग्णांना फळवाटप करून त्यांच्या प्रकृतीविषयी विचारपूस करण्यात आली.

या सामाजिक उपक्रमांचे आयोजन भाजप ता. सरचिटणीस आनंद लाड व शहराध्यक्ष सचिन मोदी यांच्या नियोजनातून करण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी सांगितले की, तरुणांमध्ये वैकुंठदादा यांच्याबद्दल विलक्षण प्रेम असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुण समाजहीताचे उपक्रम राबवत आहेत. कोणताही सण किंवा उत्सव असो, वैकुंठदादा स्वतः कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करतात. त्यांची कार्यशैली प्रेरणादायी असल्याचे सचिन मोदी यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, ता. सरचिटणीस आनंद लाड, शहराध्यक्ष सचिन मोदी, शेखर गोळे, गौतम जैन, अशोक अहिरे, धनराज उमाळे, राजन दुबे, प्रियंका पिंपळे, शितल नांगरे, संज्योती लाड, पल्लवी माने, इम्रान पानसरे, विवेक रावकर, अंकुश सुटे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, उपक्रमानंतर सर्व कार्यकर्त्यांनी वैकुंठ निवासस्थानी भेट देऊन वैकुंठ पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



**खोपोली : भाजप माजी शहराध्यक्ष रमेश रेटेकर यांना वाढदिवसानिमित्त खोपोली मंडळ निवडणूक प्रमुख यशवंत साबळे यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत शहराध्यक्ष अजय इंगुलकर, माजी शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, युवा मोर्चाचे डॉ. निकेत पाटील, कर्जत खालापूर समन्वयक हेमंत नांदे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, सुनील नांदे आदी.** (छाया : जयवंत माडपे)

# सरसकट नुकसानभरपाई देण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांना निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे शेती सबंधी झालेले नुकसाचे सरसकट भरपाई मिळावी आश्या माध्यमातून आमदार महेंद्र थोरवे यांस नुकताच वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्था खालापूर,खानाव यांच्या माध्यमातून निवेदन देण्यांत आले. या वेळी तालुक्यातील असंख्य शेतकरी उपस्थित होते. परतीच्या पावसामुळे तसेच अन्य पिकाच्या संदर्भात व नुकसाना बाबद चर्चा करण्यांत आली

या वेळी २३९ शेतकऱ्यांनी ९१, ११ हेक्टर क्षेत्रावर फळ पिक विमा उतरला असल्यांचे निवेदनात नमुद केले. त्याच बरोबर भात लागवड ते झोडणी पर्यंत हेक्टरी ५६००० हजार रुपये खर्च येत असतो, मात्र शासनाने ८५०० ऐवढीच रक्कम जाहिर केली आहे.ही शेतकऱ्यांची थट्टा केली जात असल्यांचा आरोप करण्यांत आला. त्याच बरोबर रायगड जिल्ल्यात ओला दुष्काळ जाहीर करून दर हेक्टरी किमान रुपये ६०,००० रुपये एवढी नुकसान भरपाई देण्यांत यावी. त्याचबरोबर युनिवर्सल सपो येथिल व्यवस्थापक यांस दुरध्वनी वर संपर्क केल्यास उडवा-उडवी उत्तर मिळत असल्यांचे निवेदनात नमुद केले.

खरिब आणी रब्बी हंगामातील मोठे नुकसान होत आहे. यामध्ये नाचणी तसेच माळरानावरील भाजी कंदमुळे अदिचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर फळ झाडे पिक विमा संदर्भात आमदार महेंद्र थोरवे यांनी मंत्री भरत गोगावले या संदर्भात शेतकरी वर्गांची व्यथा कथन केली, लवकरात-लवकर मिटिंग घेवून हा प्रश्न मार्गी लावू, असे शेतकरी वर्गांस सांगण्यात आले.



# नवी मुंबईत आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान २०२५ अंतर्गत नवी मुंबईत भाजपा तर्फे विविध कार्यक्रमांचे करण्यात येणाऱ्या असल्याची माहिती शिरवणे येथील पत्रकार परिषदेत सोमवारी जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी दिली.

जनजातीय स्वाभिमान संमेलनांतर्गत नवी मुंबई क्षेत्रात जास्तीत जास्त मन की बात कार्यक्रम घेतील त्यांचा सन्मान, विविध सन्मान मिळालेल्या व्यक्तींचादेखील सन्मान याअंतर्गत करण्यात येणार आहे.

यानुसार ८ नोव्हेंबर रोजी एस. व्ही. ज्युनियर कॉलेज नेरूळ येथे सकाळी १० वाजता युवा संमेलन, दुपारी १२ वाजता शिरवणे विद्यालय, सेक्टर २, नेरूळ येथे महिला संमेलन, १२ नोव्हेंबर दुपारी २.३० वाजता पारसिक हिल बेलापूर येथे व्यापारी, लघुउद्योजक व प्रबोधनाचे संमेलन अशी कार्यक्रमाची रुपरेषा असणार आहे, अशी माहिती भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी दिली.

# नवी मुंबईच्या पावणे गावात आढळली पुरातन गधेगळ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील पावणे गाव, तुर्भे, या ठिकाणी भटकंती करत असताना इतिहास अभ्याक चंदन विचारे यांना पावणे गावातील पावणेश्वर मंदिराच्या आवरात दुर्मिळ आणि पुरातन अशी गधेगळ दृष्टीक्षेपात आली आहे.



१ बाय ११ फूट रुंद आणि २ बाय १० फूट उंची असलेली हि गधेगळ असून तिच्या वरच्या भागात उजव्या बाजूस चंद्र मध्यभागी मंगल कलश कोरलेले आहे आणि डाव्या बाजूस सूर्याचा कोरलेला भाग खंडित झालेला आहे. शेंदुर फासल्याने त्या गधेगळवरील मध्यभागी लिहिलेला शिलालेख स्पष्ट दिसत नाही.

शिलालेख संबंधी साशंकता आहे. या गधेगळच्या शेजारी डाव्या आणि उजव्या बाजूस दगडामध्ये व्याघ्र शिल्प कोरलेले दोन दगड आहेत. गधेगळ या विषयावर ज्यांनी पी. एच.डी केली आहे अशा डॉक्टर. हर्षदा विरकुड यांच्याशी चंदन यांनी संपर्क साधला असता त्यांनी हे नवीन संशोधन असल्याचे सांगितले.

गधेगळ म्हणजे एक प्रकारचा जमिनीच्या दान संबंधीचा आज्ञा किंवा शापवाणी असलेला शिलालेखाचा दगड आहे, हे शिलालेख मध्ययुगीन काळात, विशेषतः शिलाहार आणि यादव राजवटीशी संबंधित असतात.

# कचरा व्यवस्थापन जागरूकता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रथम एज्युकेशन फाउंडेशनने गुरुशालाच्या सहकार्याने कचरा व्यवस्थापन जागरूकता मोहीम यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, आसाम, तामिळनाडू आणि जम्मू आणि काश्मीर या पाच राज्यांतील शाळा सहभागी झाल्या होत्या. यामध्ये कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयातील विद्यार्थ्याने चांगली कामगिरी केली आहे.

१२ अंतिम स्पर्धकांनी त्यांचे कल्पना आणि ज्ञान प्रदर्शित केले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे, खालील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्थान मिळवले. प्रथम खादीजा इब्राहिम हाफिज, फजुंदर ज्युनियर कॉलेज, रायगड, महाराष्ट्र, दुसरे स्थान: सौम्या शर्मा, कस्तुरबा गांधी निवासी मुलींची शाळा, शहर क्षेत्र फिरोजाबाद, उत्तर प्रदेश, तिसरे स्थान: सत्यम राजेश धुमल, लोकनेते डी.बी. पाटील विद्यालय, कामोठे, महाराष्ट्र. दरम्यान, सर्व सहभागींना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले, तर उत्कृष्ट विद्यार्थ्यांना विशेष सन्मान आणि बक्षिसे देण्यात आली.

# पनवेल मनपातर्फे हरित क्षेत्र उभारणी

## ओवे, फणसवाडी येथे मियावाकी पद्धतीने उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून ओवे गाव, फणसवाडी येथे मियावाकी पद्धतीने हरित क्षेत्र उभारणीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



या उपक्रमाच्या माध्यमातून ओवे गाव राखीव वन (कंपार्टमेंट क्रमांक १५३-व) या ठिकाणी घनदाट हरित क्षेत्र निर्माण करून स्थानिक जैवविविधतेत भर घालण्याचा आणि परिसरातील हवेची गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या अंतर्गत या मियाविकी हरित क्षेत्र प्रकल्पाच्या स्थळाची पाहणी ४ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल महापालिकेचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

या वेळी पर्यावरण विभागाचे प्रमुख मनोज चव्हाण आणि लिपिक प्रवीण व्हलगळ तसेच संबंधित कंत्राटदार संस्थेचे प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते.

या मियावाकी हरित क्षेत्रात बहावा, नीलमोहर, सीता अशोक, बॉटल ब्रश, गुलमोहर, पुत्रजीवी, ताम्हण अशा विविध झाडांचे रोपण करण्यात येत आहेत. यामध्ये एकुण ३३ हजार ५०० झाडांचे रोपण करण्यात येणार आहे. यापैकी आतापर्यंत ३१ हजार५०० झाडांचे रोपण करण्यात आले आहे. पाहणीदरम्यान उप आयुक्त मा. स्वरूप खारगे यांनी मियावाकी पद्धतीनुसार चालू असलेल्या कामाची प्रगती, लागवडीसाठी निवडण्यात आलेल्या प्रजातीची गुणवत्ता आणि क्षेत्राच्या देखरेखीवावत सविस्तर माहिति घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना व कंत्राटदार प्रतिनिधींना गुणवत्तेला प्राधान्य देऊन काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. या वेळी त्यांच्या हस्ते प्रतीकात्मक वृक्षारोपणदेखील करण्यात आले.

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उप आयुक्त स्वरूप खारगे यांच्या देखरेखीखाली हा प्रकल्प पर्यावरणपूरक, शाश्वत आणि हिरवेगार पनवेल घडविण्यासाठी एक सक्षम पाऊल ठरणार आहे. पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत राबविण्यात येणारा हा मियावाकी प्रकल्प पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे, मियावाकी पद्धतीद्वारे अल्प कालावधीत दाट जंगल निर्मिती करता येते. या पद्धतीत स्थानिक प्रजातीच्या विविध झाडांची घनदाट लागवड करून, केवळ काही वर्षातच नैसर्गिक जंगलासारखे हरित क्षेत्र तयार होते.

या प्रकल्पामुळे परिसरातील तापमान नियंत्रण, कार्बन शोषण, ध्वनी प्रदूषण कमी करणे तसेच पक्षी आणि कीटकांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण होण्यास मदत होईल. नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होण्यासही या उपक्रमाचा मोठा हातभार लागेल.

## आर्थिक आमिष दाखवून फसवणूक

### दोन जणांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

दोन लाख रुपयांच्या आमिषापोटी २३ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निलेश दडस असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव असन ते टाकेवाडी, सातारा येथे राहत असून ते बँकेतून २३ हजार रुपये काढून दुसऱ्या बँकेत गेले. या वेळी शेजारील इसमांकडून त्यांनी बँकेत स्लिप भरून घेतली. यावेळी बँकेत आलेला दुसरा इसम हा हिंदीतुन बोलू लागला. त्याने गोव्यावरून दोन लाख रुपये चोरून आणले असून पैसे खात्यावर जमा करून द्या, अशी विनंती त्यांनी केली. आणि बोलण्यात गुंतवून ते दोघे दडस यांना बाहेर घेऊन गेले. आणि दोन लाख रुपये त्यांच्याकडे ठेवण्यास सांगितले. दडस यांनी नकार दिला. त्यावेळी दहा-पंधरा मिनिटात येतो असे सांगितले आणि विश्वास नसेल तर तुझ्याकडचे २३ हजार माझ्याकडे ठेवायला दे असे सांगून काळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीतून दोन लाख रुपये दंडस याना दिले आणि ते पायी निघून गेले. दोघांची वाट पाहिली असता ते आले नाहीत. दडस यांनी पिशवी पाहिली असता रुमालात पैसे होते. रुमाल उघडून पाहिला असता कागदांचे बंडल दिसून आले आणि फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

## अल्पवयीन तरुणीचे अपहरण

**पनवेल :** राहत्या घरातुन कोणीतरी अज्ञात इसमाने काहीतरी आमीष दाखवून एका अल्पवयीन तरुणीला तिच्या कुटुंबियांच्या कायदेशीर रखवालीतून त्यांचे संमतीशिवाय पळवून नेला आहे. याबाबत उलवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे .

अपहृत मुलगी नामे गौतमी रमाकांत वाघमारे वय १६ वर्षे हीस रा. रु.नं. ४०४, दुर्वांकुर अपार्टमें, प्लॉ नं. २०३, सेक्टर ०३, उलवा ता. पनवेल येथून तिच्या कुटुंबियांच्या कायदेशीर रखवालीतून त्यांचे संमतीशिवाय पळवून नेण्यात आले आहे. उंची सुमारे ०५ फुट अंदाजे, अंगाने सडपातळ, रंगाने गोरा, चेहरा- उभट, नाक सरळ, डोक्याचे केस लांब मोकळे, अंगात जिन्स पँट व टी-शर्ट, परंतु नक्की रंग माहीती नाही., कानात छोटे मणी असलेले फुल, नाकात फुली, तिला मराठी, हिंदी भाषा अवगत , सोबत तखतज कंपनीचा मोबाईल आहे.



याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने उलवा पोलीस ठाणे पोलीस उपनिरीक्षक अनिल राजुरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवीन पनवेल ए टाईप रेशन पुरवठ्याबाबत वृषाली वाघमारेंचे तहसीलदारांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल ए टाईप रेशन क्र. १७ या दुकानातून ग्राहकांना अनियमित पुरवठा मिळत असल्याबाबत पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे यांनी पनवेल तहसीलदारांना निवेदन दिले आहे.



वाघमारे यांनी तहसीलदार भोसले(भामरे) मॅडम व धान्य पुरवठा अधिकारी अश्विनी धांनवे मॅडम यांच्याशी सविस्तर सकारात्मक चर्चा केली. निवेदनात म्हटल्याप्रमाणे त्यांनी तहसीलदारांना सांगितले की, नवीन पनवेल ए टाईप विभागात रेशन दुकान क्र. १७ यामधून तेथील रहिवाशांना धान्य मिळत असते, परंतु काही वर्षे सदर रेशन दुकानांचे मालक बदलल्यामुळे रहिवाशांना दर महिन्यांला योग्य प्रमाणात धान्य मिळत नाही. त्याचप्रमाणे सदर दुकानांत प्रचंड गर्दीला सामोरे जावे लागते. त्यामध्ये दिव्यांगांना तर धान्य मिळतच नाही. नियोजनबध्द धान्य देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सदर विभाग रेशनचे दुकान उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, कारण ए-टाईप विभागामध्ये जास्तीत जास्त ग्राहकांना सोयीस्कर होऊ शकते.

यासोबतच समस्या मांडताना वाघमारे यांनी सांगितले की, ए टाईप विभागात रेशन दुकान क्र. १७मध्ये मिळणारे धान्य आता पंचशील विभागात मिळत असल्याने ए टाईप मधील लोकांना धान्य आणताना मोठी कसरत करावी लागत आहे. दरम्यान, रेशनवर मिळणाऱ्या धान्याची गुणवत्ता घसरली आहे. निकृष्ट दर्जाचे धान्य रेशनधारकांना मिळते. तर रेशन प्रत्येक महिन्याच्या १ ते १० तारखेच्या आत मिळावे, अशीही मागणी वाघमारे यांनी केली.

यावर तहसीलदार मॅडम यांनी नागरिकांना धान्य महिन्याच्या सुरुवातीला मिळाला पाहिजे व धान्य चांगल्या दर्जाचे मिळावे यासाठी प्रयत्न करणार, असे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे तहसीलदार मॅडम व धान्य पुरवठा अधिकारी मॅडम यांनी सदर सेक्टर १३ मध्येच पुढच्या महिन्यापासून रेशनिंग चे दुकान चालू होईल व रेशन धारकांना नियोजनबद्ध धान्याचे वाटप होईल, असे आश्वासन दिले.

## चिरनेरमध्ये सडक्या बटाट्याची विक्री

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरात थाटलेल्या राज्यस्थान राज्यातून धंद्यासाठी आलेले मारवाडी दुकानदारांच्या येथील सर्वच किराणा मालाच्या दुकानात सडक्या बटाट्यांची विक्री केली जात असल्याची माहिती येथील ग्राहकांनी सोमवारी दिली.



चिरनेर परिसरात मारवाड्यांनी किराणा मालाची मोठमोठी दुकाने थाटली आहेत. दर दिवसाला त्यांच्या लाखो रुपयांच्या मालाची विक्री होत आहे.

या मारवाड्यांचा दररोजचा धंदा तेजीत असल्याचे दिसून येत आहे, मात्र चिरनेर परिसरातील स्थानिक दुकानदारांवर गंडांतर आले असून, त्यांच्या किराणा मालाच्या विक्रीवर मोठा परिणाम झाला असून, गावातील प्रत्येक दुकानदारांचा व्यवसाय डबघाईला आला आहे.

मारवाडी दुकानदारांनी विक्रीसाठी ठेवलेले बटाटे सडकी असून, भाव मात्र बरोबर घेऊन येथील ग्राहकांची ते बिनधास्तपणे फसवणूक करत आहेत.

एकंदरीत ग्राहकांच्या जीवाशी खेळ खेळत आहेत. ग्राहकांनी याविषयाबाबत तक्रार करून सुद्धा हे मारवाडी याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहेत, मात्र अशा प्रकारची बटाटे खाल्ल्याने आरोग्यावर त्याचा मोठा परिणाम होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही, असे ग्राहकांमधून बोलले जात असताना, अन्न व औषध प्रशासनाने अशा गंभीर बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## फ्लॅट देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

स्वस्तात फ्लॅट देतो असे सांगून, प्रत्यक्षात फ्लॅट न देता भरलेली रक्कमही परत न केल्याप्रकरणी संभाजी शिवाजी सपकाळ नावाच्या व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दिलीप दळवी हे फणसपाडा, सीबीडी बेलापूर येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. त्यांनी संभाजी सपकाळ यांच्या ऑर्चिड ब्लोसॉम या नावाच्या प्रोजेक्टमध्ये फ्लॅट घेण्याचे ठरवले. या वेळी त्यांनी सात लाख आठ हजार रुपये चेक द्वारे दिले. या वेळी सपकाळ यांनी भरलेली रक्कम परत केली नाही किंवा व्यवहार रद्द झाल्यास व्याजासह रक्कमेचा एक चेक दिला होता. या वेळी प्रोजेक्टचे काम पूर्ण झाल्यानंतर बुकिंग प्रमाणे फ्लॅट देण्यात येतील, असे सांगितले. २०१६ पासून पैसे घेऊन फ्लॅट देखील दिलेला नव्हता.

दळवी हे कंपनीच्या ऑफिसवर गेले असता ऑफिस बंद मिळून आले. मोबाईल क्रमांकवर संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे देऊन फोन उचलण्याचे बंद केले. दळवी यांच्याकडे दिलेला चेक त्यांनी बँकेत टाकला असता तोदेखील बाऊन्स झाला.



**पेण : भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस वैकुंठ पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी आमदार रविशेठ पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, मिलींद पाटील आदी उपस्थित होते.**

## रोडपाली परिसरात सामाजिक सेवा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शीख धर्माचे संस्थापक आणि पहिल्या गुरु श्री गुरु नानक देव जी यांच्या ५५६व्या जयंतीनिमित्त रोडपाली परिसरात सामाजिक सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेते अमर ठाकूर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम झाला.

रोडपाली येथील डी-मार्ट शेजारी आयोजित या सेवा उपक्रमात परिसरातील नागरिकांना फ्रुटीचे वाटप करण्यात आले. गुरुनानक जयंतीचा संदेश असणाऱ्या सेवा आणि मानवता या भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात विशेष सहभाग म्हणून रविनाथ पाटील, जमीर शेख, सतिंदर सिंग संधू, केशव यादव, संतोष वांडेकर, अझहर शेख, विक्रम देशमुख यांसह अनेक युवा कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.



## सामुदायिक तुळशी विवाह सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धार्मिक परंपरा आणि सामाजिक एकोपा जपत नवीन पनवेल परिसरातील रहिवाशांनी एकत्र येत माजी नगरसेविका सुशीला घरत यांच्या पुढाकाराने सोमवारी सामुदायिक तुळशी विवाह सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात केला. कार्तिक शुद्ध द्वादशीच्या शुभ मुहूर्तावर हा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता, या सामूहिक विवाह सोहळ्यामुळे अनेक कुटुंबांना एकत्र येऊन या पवित्र परंपरेचा भाग होता आले.

या सोहळ्यादरम्यान पारंपरिक पद्धतीने तुळशी वृंदावनाची सजावट करण्यात आली होती. उपस्थित महिलांनी पारंपरिक वेशभूषा करून विधींमध्ये सहभाग घेतला. या वेळी माजी नगरसेविका सुशीला घरत, सामाजिक कार्यकर्ते जगदीश घरत, पनवेल वैद्यकीय सेलच्या अध्यक्षा डॉ. अस्मिता जगदीश घरत, प्रभाग -१७ अध्यक्ष - विजय म्हात्रे, कल्पना ठकेकर, क्रांती चौधरी, गौरी पवार, भिमा नरे, दिपाली वरसोलकर, शोभा गायकवाड, शिवनाथ पन्हाळे, संदिप पाटील, हरि भिसे, अनंता ठाकूर, किशोर रजपूत, अमित पाटील, दिपेश पाटील, रुपेश भुजबळ, तुषार भगत, सुशील साहू, शिवाजी त्रिभुवन, प्रफुल्ल पवार. हनुमंत मिसाळ, विश्वास पवार यांच्यासह रहिवाशी उपस्थित होते.



**पनवेल : आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जयंतीनिमित्ताने महापालिकेमार्फत अभिवादन करण्यात आले. या वेळी नाट्यगृह व्यवस्थापक राजेश डोंगरे, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अमोल घायाळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख उपस्थित होते.**



**उरण : कार्तिकी एकादशीपासून तुळशी विवाहाला सुरुवात होते. दरम्यान, तुळशी विवाहासाठी लागणारे पूजा साहित्य ऊस, आवळा, बोर, आंब्याची पाने आणि सजावटीच्या वस्तू मोठ्या प्रमाणावर बाजारात आल्या आहेत. लोक त्यांची खरेदी करीत असल्याचे चित्र आहे.**

## पाले येथे मोफत आरोग्य शिबिर

### ८१ नागरिकांनी घेतला लाभ



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष व कोक्हार्ड फाउंडेशन, एपीएम टर्मिनल यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील पाले गावात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अमित म्हात्रे शाखा अध्यक्ष भारतीय जनता पक्ष, अविनाश म्हात्रे सदस्य वोक्हार्ड फाउंडेशन, फाऊंडेशनचे पदाधिकारी सदस्य, पाले गावचे ग्रामस्थ यांचे विशेष सहकार्य लाभले.

या आरोग्य शिबिरावेळी भाजप राज्य परिषद सदस्य रवी भोईर, तालुका ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, उपाध्यक्ष मुकेश म्हात्रे, मुकुंद गावंड, ग्रामीण महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, सरचिटणीस प्रशांत ठाकूर, चिटणीस विवेकानंद म्हात्रे, उरण ग्रामीण युवा मोर्चा अध्यक्ष शैलेश गावंड, पुर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, सारडे सरपंच रोशन पाटील, माजी जि. प.सदस्य जिवन गावंड, श्रिया फाउंडेशनचे संस्थापक स्मिता संदीप म्हात्रे आदी उपस्थित होते.

## खारघरमध्ये क्रिकेट विश्वचषकातील अंतिम सामन्याचे लाईव्ह प्रक्षेपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या विश्वचषकातील अंतिम सामन्याचे उत्साहपूर्ण वातावरण खारघरमध्ये पाहायला मिळाले. रविवारी सायंकाळी सेक्टर १३, डेली बाजार येथे मोठ्या स्क्रीनवर लाईव्ह प्रक्षेपणाचे विशेष आयोजन करण्यात आले होते.



भारतीय महिला संघाचा ऐतिहासिक प्रवास पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमला. या विशेष उपक्रमाचे आयोजन भाजप खारघर मंडलाध्यक्ष प्रवीण काकुराम पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले. सामन्यादरम्यान युवकांसह कुटुंबियांनीही उत्साहात सहभाग घेतला. भारताच्या प्रत्येक चौकार-षटकारावर जल्लोष झाला, तर प्रतिस्पर्धी संघाविरुद्धच्या विकेटवर आरोळ्यांचा कडकडाट दुमदुमला.

कार्यक्रमाला खारघर मंडलाध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह रायगड जिल्हा चिटणीस ब्रीजेश पटेल, अशोक जांगिड़, महेश भोईर, महिला मोर्चाच्या गायत्री महापात्रा, रेखा सिंग उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी भारतीय महिला संघाच्या खेळाडूंच्या जिद्दीचं आणि मेहनतीचं कौतुक करत नागरिकांसह लाईव्ह सामना पाहिला.


## संपादकीय

# दुटप्पी कांगावा

आपली सत्ता असलेल्या राज्यांमध्ये मतदारयाद्यांच्या फेरपडताळणी (एसआयआर) मोहिमेला विरोध करायचा आणि जिथे आपली सत्ता नाही तिथे मतचोरी व दुबार मतदारांच्या नावाने ओरड करायची असा दुटप्पीपणा देशातील विरोधकांकडून सर्रास सुरू असताना, महाराष्ट्रातील राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी राज्यातील बहुप्रतिक्षित २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. या निवडणुकांमध्ये दुबार मतदारांचा प्रश्न हाताळण्यासाठीच्या उपाययोजनाही आयोगाने स्पष्ट केल्या असून आतातरी विरोधकांची कांगावाखोर ओरड थांबेल अशी अपेक्षा आहे.

**राज्यातील महायुती सरकारच्या गतिमान कारभारामुळे विरोधकांकडे कोणताही मुद्दा नसल्याने त्यांनी मतचोरीचे खोटे नरेटिव्ह पसरवण्याचे काम जोरात सुरू केले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये आपला पराभव अटळ आहे हे स्पष्ट दिसू लागल्यानंतर तर मतदारयाद्यांमधील घोळ दुरुस्त केल्याशिवाय निवडणुका घेऊ नका अशी मागणी करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. वास्तविक मतदारयाद्यांमधील ज्या दोषांचा गवगवा विरोधक करत आहेत तशा प्रकारचे दोष मतदारयाद्यांमध्ये वर्षानुवर्षे दिसत आले आहेत. ज्या राज्यांमध्ये भाजपविरोधक सत्तेवर आहेत, तिथे निवडणूक आयोगाच्या मतदारयाद्या निर्दोष करण्याच्या फेरपडताळणी (एसआयआर) मोहिमेला विरोध करायचा आणि जिथे विरोधकांची सत्ता नाही तिथे मतदारयाद्यांमध्ये दोष असल्याची व मतचोरीची ओरड करायची असा दुटप्पीपणा विरोधकांकडून सुरू आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील बहुप्रतिक्षित, २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी जाहीर केला. त्यासाठी २ डिसेंबरला मतदान होणार असून निकाल ३ डिसेंबर रोजी जाहीर होईल. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकांमध्ये विरोधकांना काहिशा बऱ्या जागा मिळाल्या तेव्हा त्यांनी त्या निवडणुकांमधील मतदानाविरोधात अवाक्षर काढले नाही, परंतु पाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीच्या बाजूने मतदारांनी सुस्पष्ट कौल दिल्यानंतर तो स्वीकारणे मात्र विरोधकांना आजतागायत जमलेले नाही. तेव्हापासून त्यांनी ईव्हीएम, मतदारयाद्या व एकंदरच निवडणूक आयोग यांच्याविरोधात ओरड सुरू केली आहे. लोकशाही धोक्यात आहे व ती वाचवण्यासाठी आपण एकत्र येत आहोत असा कांगावा करीत विरोधीपक्षातील मंडळी खरे तर निव्वळ सत्तेच्या लालसेने एकत्र येत आहेत हे न जाणण्याइतकी राज्यातील जनता भाबडी नाही. एकीनंतरही पराभव झालाच तर तो मतचोरीमुळे झाल्याची ओरड करता यावी यासाठी त्यांनी वातावरणनिर्मिती चालवल्याचेही स्पष्ट दिसते. नुकतीच मतदारयादीतील दुबार नोंदणीबद्दल विरोधकांनी बरीच आगपाखड केली, परंतु ती करतानाही या मंडळींनी विशिष्ट अल्पसंख्य धर्मीय दुबार, तिबार मतदारांकडे दुर्लक्ष केले अशी टीका सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केली आहे. विरोधकांच्या या दुटप्पीपणामागे त्यांची पराभवाची भीतीच आहे. राज्यात विकासकामे वेगाने सुरू असताना ते सरकारविरोधात कोणत्या मुद्यांवर बोलणार? पण या दुबार मतदारांच्या प्रश्नावरही निवडणूक आयोगाने टूल तयार केले आहे. मतदारयादीत जिथे संभाव्य दुबार नावे असतील त्या ठिकाणी दोन स्टार्स असतील. त्या मतदारांशी संपर्क केला जाईल. त्या मतदाराला कुठल्या मतदानकेंद्रावर मतदान करायचे आहे हे विचारले जाईल आणि त्यानंतर त्याच मतदानकेंद्रावर त्या मतदाराला मतदान करता येईल. अशा एखाद्या मतदाराकडून आधी प्रतिसाद न मिळाल्यास मतदानकेंद्रावर त्याच्याकडून प्रतिज्ञापत्र घेतले जाईल की त्याने अन्य कुठल्याही मतदानकेंद्रावर मतदान केलेले नाही. निवडणूक आयोगाच्या खबरदारीच्या या प्रयत्नांचे तरी विरोधकांकडून स्वागत होईल व आपली कांगावाखोर ओरड ते थांबवतील, अशी अपेक्षा आहे.**

# खिद्रापूर : अद्भूत खगोलशास्त्रीय प्रकाशपर्वाचे ठिकाण



खिद्रापूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील एक छोटेसे गाव... हे गाव कोल्हापूर शहरापासून साधारण ७० किमी अंतरावर आहे. खिद्रापूर म्हणजे अध्यात्म आणि मानवी सौंदर्याच्या मिलापावर लिहिलेली दगडातील कोरीव कविता आहे. खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी एक अद्भूत घटना घडते. चंद्रप्रकाशाचा वर्तुळाकार कवडसा स्वर्गमंडपातील वर्तुळाकार झरोक्यामधून जमीनीवरील चंद्रशिलेसोबत तंतोतंत जुळतो. संपूर्ण भारतात हे प्रकाश पर्व प्रसिद्ध आहे. दिवाळीच्या दीपोत्सवात कोल्हापूर जिल्ह्यासाठी हे प्रकाश पर्व अध्यात्म आणि खगोलशास्त्रीय चमत्कार म्हणून हजारो वर्षांपासून चर्चेत आहे.

या प्रकाश-योगायोगाचा अनुभव घेण्यासाठी शेकडो पायांना खिद्रापूरच्या मंदिराची आठवण होते. दिवाळीनंतरच्या दीपोत्सवात कोल्हापूर व महाराष्ट्रासाठी ही एक पर्वणी असते. चंद्र प्रतिबिंबाचा हा सोहळा पाहण्यासाठी त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा येथून अनेक पर्यटक येतात. खगोलशास्त्रीयदृष्ट्या या अनुभूतीला वेगळे महत्त्व आहे. हजारो खगोलशास्त्रीय, देश-विदेशातील छायाचित्रणातील मान्यवर या ठिकाणी दिवाळीनंतर येणाऱ्या पौर्णिमेला अर्थात त्रिपुरारी पौर्णिमेला मध्यरात्री एकत्रित येतात. काही क्षणांसाठी वास्तुशास्त्र आणि खगोलशास्त्रातील अद्भूतता अनुभवण्यासाठी देशभरातील चिकित्सक अभ्यासक या ठिकाणी येत राहतात. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक प्राचीन मंदिरांपेक्षा खिद्रापूरचे मंदिर लक्षणीय ठरते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री मंदिरातील हजारो दिवे प्रज्वलित होतात, भजन-कीर्तन, नृत्य आणि दीपोत्सवाचे कार्यक्रम होतात. हजारो वर्षांपासूनचा हा उत्सव या ठिकाणी सुरू आहे. अध्यात्म आणि विज्ञान या ठिकाणी हातात हात घालून निसर्गाच्या अद्भूत चमत्काराला अनुभवते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री जेव्हा चंद्र या मंदिरातील स्वर्ग मंडपाच्या गोलाकार भागावर येतो त्या ठिकाणावरून चंद्राचा पूर्ण प्रकाश त्याच आकाराच्या चंद्रशिलेवर पडतो. काही सेकंदांचा हा पूर्णतेचा आनंद असतो. अगदी खगोलशास्त्रज्ञांच्या घड्याळातून घेतलेल्या अंदाजानुसार केवळ सहा ते बारा सेकंदाचा हा परिपूर्ण गोलाकारांचा प्रकाशीय मिलाप असतो.

या दीपोत्सवासाठी ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराचे वास्तु शिल्प देखील अभ्यासनायोग्य आहे. देशभरातील शिल्प प्रेमी या मंदिराला कायम भेटी देत असतात. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठी वसलेले आहे, त्यामुळे नद्याच्या प्रवाहाप्रमाणे सजीव व बोलक्या शिल्प सौंदर्याची अनुभूती मंदिराच्या परिसरात कायम येत राहते.

कोपेश्वर मंदिर हे प्रामुख्याने शिव (महादेव) आणि विष्णू यांना समर्पित आहे. मंदिराची उभारणी साधारणतः चालुक्य व शिलाहार राजवटीत सुरू झाली असावी असे ऐतिहासिक मत आहे. नंतर ११-१२व्या शतकात शिलाहार व यदुवंशीय राजे यांनी मंदिराचा विस्तार केला. मंदिराला भारत सरकारद्वारे राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून मान्यता दिलेली आहे.

कोपेश्वर मंदिर हे शिल्पकलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ते शिलाहार शैली व मध्ययुगीन महाराष्ट्रातील मंदिरकलांचा संगम दर्शवते. मुख्य मंडप, आच्छादित मंडप, अंतराळ व गर्भगृह या भागांमध्ये मंदिर विभागलेले आहे. बाहेर एका मंडपावर ४८ खांब आहेत, हे मंडप स्वर्गमंडप म्हणून ओळखले जाते.

या ४८ खांबांच्या आत एक वर्तुळाकार खुली जागा आहे - ही जागा होम, यज्ञ, हवन यासाठी राखून ठेवली गेली आहे, ज्यामुळे धूर बाहेर निघे, मात्र हेच प्रयोजन त्रिपुरारी पौर्णिमेला अद्भूत खगोलशास्त्रीय निमित्त ठरते.स्तंभांच्या आतील भागावर अनेक देव-देवतांची शिल्पे आहेत. या मंदिर परिसरात अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

मंदिराच्या शिखरापासून ते गर्भगृहापर्यंत अनेक लहान शिखरांची ओळ आहे, जी कलात्मकतेने सजवलेली आहे.


खिद्रापूरला येण्यासाठी अनेक मार्ग आहेत. सांगली मार्गे किंवा गावातील स्थानिक रस्ते वापरुन या ठिकाणी पोहचता येते. कोल्हापूर पासून केवळ ७० किलोमीटर अंतरावर हे प्रख्यात कोपेश्वर मंदिर आहे.

**-प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# भारतीय क्रिकेटचा एक चमचमता तारा विराट कोहली

भारतीय क्रिकेटचा आयकॉनिक खेळाडू विराट कोहली याचा आज वाढदिवस (जन्म : ५ नोव्हेंबर १९८८, दिल्ली, भारत). विराट एक असा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आहे, ज्याला अनेक जण खेळाच्या इतिहासातील महान फलंदाजांपैकी एक मानतात. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)मध्ये तो रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी)कडून खेळतो (आणि पूर्वी कर्णधार होता). तो तिन्ही आंतरराष्ट्रीय स्वरूपांमध्ये -कसोटी क्रिकेट, एकदिवसीय आणि ट्वेंटी-२० भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधारदेखील आहे.

कोहलीने त्याच्या शिस्त आणि वचनबद्धतेबद्दल संघातील खेळाडू, प्रतिस्पर्धी आणि क्रिकेटमधील दिग्गजांकडून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. त्याने क्रिकेटचा चेहरामोहरा आणि खेळाची तयारी कशी करावी हे बदलले आहे. त्याच्याकडे असलेली शिस्त नेहमीच वेगळी दिसते, असे २०२३च्या क्रिकेट विश्वचषकासाठी कोहलीला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून घोषित केल्यानंतर महान क्रिकेटपटू ब्रायन लारा यांनी कोहलीबद्दल म्हटले होते.



कोहलीकडे अनेक क्रिकेट विक्रम आहेत, ज्यात एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक वैयक्तिक शतके आणि एकदिवसीय विश्वचषकाच्या एकाच आवृत्तीत सर्वाधिक धावा करणे यांचा समावेश आहे. त्याला तीन वेळा जागतिक स्पर्धांमध्ये प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून घोषित करण्यात आले आहे. तो २०११ एकदिवसीय विश्वचषक, २०१३ आयसीसी (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०२४ टी०२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघांचा सदस्यदेखील होता. भारताने २०२४ टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर त्याने या प्रकारातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. अंतिम सामन्यात सामनावीर म्हणून घोषित झाल्यानंतर कोहलीची घोषणा आली. एका वर्षानंतर तो कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाला, तो या स्वरूपात भारताचा सर्वात यशस्वी कर्णधार होता. त्याचे लग्न लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्माशी झाले.

कोहलीला अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममधील एका स्टँडचे नाव त्याच्या नावावर ठेवण्यात आले आहे. (साभार : इंटरनेट)




# मोबाईल फोन रिस्टार्ट करण्याचे भन्नाट फायदे

आपल्या हातातील छोटंसं यंत्र अर्थात मोबाईल फोन, याच्याशिवाय आपल्या दिवसाची सुरुवातच होऊ शकत नाही. मोबाईल हा दैनंदिन आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. एखादा दिवस जर फोन बिघडला तर अवघं जग थांबल्यासारखं वाटतं, पण फोनमध्ये काही छोटीमोठी गडबड झाली की, फोन रिस्टार्ट करण्याचा सल्ला दिला जातो, पण कधी कधी फोन एखाद्या कारणाशिवायदेखील रिस्टार्ट केला पाहिजे. याचे अनेक फायदे आहेत. वर्षानुवर्षे फोन वापरणाऱ्या व्यक्तीलासुद्धा कदाचित फोन रिस्टार्ट करण्याचे फायदे माहिती नसतील. फोनच्या परफॉर्मन्सपासून ते त्याच्या बॅटरी लाईफपर्यंत अनेक गोष्टींसाठी फोन रिस्टार्ट करणे फायद्याचे आहे. ज्याप्रमाणे माणसाला रोजच्या कामातून एका ब्रेकची गरज असते, त्याचप्रमाणे फोनला देखील रिस्टार्ट ब्रेकची गरज असते.



मोबाईल फोन रीस्टार्ट करण्याचा मोठा फायदा असा आहे की, यामुळे रॅम क्लिअर होतो. याचा अर्थ असा की, तुम्ही तुमचा फोन रीस्टार्ट केला की त्याच्या रॅमवर साठून राहिलेल्या कॅश फाइल्स काढून टाकल्या जातात. तुम्ही एखादे ॲप बंद केले तरीही ते बॅकग्राउंडमध्ये चालू राहू शकते, ज्यामुळे रॅम भरतो आणि फोनचा वेग कमी होतो. अशावेळी जर तुम्ही तुमचा फोन रिस्टार्ट केला, तर रॅम बॅकग्राऊंड ॲप बंद करतो, ज्यामुळे तुमच्या फोनचा वेग आणि कार्यक्षमता वाढते.

वाय-फाय, ब्लूटूथ किंवा सेल्युलर डेटा कनेक्टिव्हिटीमध्ये समस्या येत असतील, तर तुमचा फोन रिस्टार्ट केल्याने बऱ्याचदा या समस्या सुटू शकतात. उदाहरणार्थ, समजा तुम्ही तुमचा फोन वाय-फायशी कनेक्ट केला आहे, पण तरीही इंटरनेट काम करत नाही. बऱ्याच लोकांना वाटेल की, ही समस्या वाय-फायमध्ये आहे, परंतु कधीकधी दुसऱ्या फोनच्या हॉटस्पॉटशी कनेक्ट केल्यानेही इंटरनेट बिघाड होऊ शकतो. मात्र, फोन रिस्टार्ट करून अशा कनेक्टिव्हिटी समस्या सोडवता येतात. जर, तुमचा फोन जास्त हँग होत असेल, तर तुम्ही त्याला एकदा तरी रिस्टार्ट करून बघायला हवे. यामुळे समस्या तात्पुरती कमी होऊ शकते, पण जर तुमचा फोन वारंवार हँग होत असेल, तर त्याचे नेमके कारण शोधून समस्येचे निराकरण करायला हवे. एकंदरीत फोन रिस्टार्ट केल्याने मेमरी रिफ्रेश होण्यास, ॲप एरर दुरुस्त होण्यास आणि किरकोळ सिस्टम ग्लिच दूर करण्यास मदत होते.

# स्वातंत्र्य चळवळीतील नेते चित्तरंजन दास

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक अग्रगण्य बंगाली नेते, प्रसिद्ध कायदे पंडित व प्रभावी वक्ते चित्तरंजन दास यांची आज जयंती (५ नोव्हेंबर १८७०-१६ जून १९२५). देशबंधू या उपाधीनेच ते ओळखले जातात. त्यांचा जन्म कलकत्ता येथील उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. दासांचे मूळ घराणे विक्रमपूर परगण्यातील. वडील भुवनमोहन कलकत्त्यात वकिली करीत. ते ब्राह्मो समाजाचे होते.

चित्तरंजन यांचे शिक्षण कलकत्त्यात झाले. बीए झाल्यावर १८९०मध्ये ते आयसीएस परीक्षेकरिता इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये त्यांनी दादाभाई नवरोजी यांच्या निवडणूक प्रचारसभांतून भाषणे दिली. याच वेळी मॅक्लिन नावाच्या एका इंग्रजाने हिंदी जनतेविषयी अनुदार उद्गार काढले. तेव्हा हिंदी लोकांची सभा घेऊन चित्तरंजनांनी मॅक्लिनचा निषेध केला. एवढेच नव्हे, तर त्यांनी चळवळ करून त्याचे संसदेतील सभासदत्व रद्द करविले. याचा परिणाम म्हणूनच आयसीएस परीक्षेत ते यशस्वी होऊ शकले नाहीत व अखेर बॅरिस्टर होऊन त्यांना भारतात परतावे लागले (१८९३). विद्यार्थीदशेत त्यांनी इंग्रजी तसेच बंगाली साहित्याचा अभ्यास केला. शेली, ब्राउनिंग, कीट्स, बंकिमचंद्र, गिरिशचंद्र घोष, टागोर हे त्यांचे आवडते



**निमित्त**

लेखक. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन बंगाली साहित्यात त्यांनी मोलाची भर घातली. त्यांनी कलकत्त्यास वकिलीस प्रारंभ केला, पण सुरुवातीस फारसा जम बसेना. म्हणून ते ग्रामीण भागात वकिली करू लागले. या वेळी भुवनमोहन यांना फार कर्ज झाले होते. त्यांनी एके दिवशी आपले नाव दिवाळखोरीत नोंदविले. यामुळे प्रतिष्ठा आणि पैसा या दोहोंना त्यांना काही दिवस मुकावे लागले. चित्तरंजन यांनी या काळात मालंच (१८९५) हा पहिला भावगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला. यात देशबंधूंचे सारे तत्त्वज्ञान सामावले आहे.

चित्तरंजनांचा विवाह १८९७मध्ये वासंतीदेवी या श्रीमंत घराण्यातील युवतीशी झाला. त्यांना एक मुलगा आणि दोन मुली होत्या. चित्तरंजनांचा वकिलीत हळूहळू जम बसत होता. या सुमारास वंगभंगाची चळवळ सुरू झाली. अरविंद घोष व इतर काही तरुणांवर खटले भरण्यात आले. अलीपूर बॉंबकेस म्हणून हा खटला गाजला. अरविंदांकडे पैसे नव्हते. तेव्हा चित्तरंजनांनी आपली घोडा-गाडी विकून स्वेच्छेने हा खटला चालविला. अरविंदबाबू निर्दोषी सुटले (१९०८). त्यानंतर चित्तरंजनांची मोठ्या वकिलांत गणना होऊ लागली.

विद्यार्थी असल्यापासूनच ते सार्वजनिक व राष्ट्रीय कार्यांत भाग घेत. त्यांच्या राजकीय विचारांवर सुरुवातीस टिळक वगैरे जहालमतवाद्यांची छाप होती. अनुशीलन समिती या क्रांतिकारक संघटनेचे ते सदस्य होते. एक नामांकित कायदेपटू होते, तरी त्यांचे हृदय हे कवीचे होते. गोरगरीब, पददलित यांबद्दल त्यांना सहानुभूती होती. मालंचनंतर त्यांनी माला, सागर संगीत, किशोर-किशोरी व अन्तर्यामी हे काव्यसंग्रह प्रसिद्ध केले. अखेरच्या दिवसांत कामाच्या ताणाने त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. दार्जिलिंग येथे ते विश्रांतीस गेले आणि तेथेच हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





# आरोग्य प्रहर

## पोट फुगतं-गॅसेस होतात? 'हा' घरगुती उपाय करा

पोटात गॅस होणे किंवा पोट फुगणे ही आजकाल खूपच सामान्य समस्या आहे. बहुतेक लोकांना ही तक्रार जेवणानंतर जाणवते. जेव्हा आपली पचनसंस्था नीट काम करत नाही किंवा आपण चुकीचे अन्न खातो,



तेव्हा गॅस, जडपणा आणि अस्वस्थता सुरू होते. या त्रासातून आराम मिळवण्यासाठी बरेच लोक औषधे घेतात, पण अनेकदा त्याचा परिणाम होत नाही. अशा वेळी आयुर्वेदिक घरगुती उपाय अतिशय प्रभावी ठरतात.

डॉक्टर रॉबिन शर्मा यांनी आपल्या इंस्टाग्रामवर पोटात गॅस होण्याच्या समस्येसाठी एक सोपा पण प्रभावी उपाय सांगितला आहे. त्यांचं म्हणणं आहे की या उपायाचा परिणाम पहिल्याच वेळी दिसू शकतो.

साहित्य

अर्धा छोटा चमचा गायीचं तूप, दोन चिमूट सैंधव मीठ, दोन चिमूट हिंग

कृती आणि सेवन करण्याची पद्धत

एका छोट्या भांड्यात अर्धा चमचा गायीचं तूप घ्या. त्यात २ चिमूट सैंधव मीठ आणि २ चिमूट हिंग घाला. सर्व नीट मिसळून एक लहान चटणीसारखं मिश्रण तयार करा. हे मिश्रण जेवण करण्यापूर्वी लगेच खा. ज्यांना गॅस, पोट फुगणे किंवा अफारा होतो, त्यांच्या साठी हा उपाय अत्यंत फायदेशीर आहे.

हिंगाचे फायदे

हिंग पचनासाठी आवश्यक एन्झाईम्स सक्रिय करते, ज्यामुळे अन्न पटकन पचतं. हे आतड्यांचं कार्य सुधारतं. हिंग गॅस, पोटदुखी, आम्लपित्त आणि बद्धकोष्ठता यावर उपयोगी आहे.

सैंधव मिठाचे फायदे

सैंधव मीठ पचनसंस्था मजबूत करते. हे आतड्यातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते. यामुळे भूक वाढते आणि अपचन, पोट फुगणे यासारख्या तक्रारी कमी होतात. हा उपाय दिवसातून फक्त एकदाच, जेवणाआधी घ्यावा. जर समस्या कायम राहिली, तर डॉक्टर किंवा आयुर्वेदिक तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

भारतीय आयुर्वेद हे प्राचीन असून अनेक उपाय त्यात सांगितले आहेत, ज्यातील काही घरगुती आहेत. ते आवर्जून करून पहायला हरकत नाही.

# महेंद्र युजिन प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य द्या

## लव्हेज ग्रामस्थांची मागणी




**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील वासरंग येथील महिंद्र युजिन (स्पेशल स्टील) या कारखान्याच्या अतिरिक्त जागेत कामगारांची निवासी संकुल होती ती आता जमीनदोस्त करून त्या जागी नियोजित प्रकल्पाची जोरदार तयारी असून या प्रकल्पात लव्हेज गावच्या भूमिपुत्रांना प्राधान्य द्यावे, अशा आशयाचे निवेदन अलीकडेच खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांना ग्रामस्थांतर्फे देण्यात आले असून याबाबत तहसीलदारांनी त्यांना न्याय देण्यासंदर्भात सहकार्य करू, असे सांगितले आहे. याबाबत व्यवस्थापनालाही निवेदन दिल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले आहे, मात्र अद्याप व्यवस्थापनाकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

महिंद्रा युजिन (स्पेशल स्टील) या कारखान्याच्या उभारणीसाठी १९६५ ते १९७५ या कालावधीत ग्रामस्थानी आपली भातशेतीची ७० ते ८० एकर जागा व्यवस्थापनाला कवडीमोल भावांनी दिली. स्थानिकांना रोजगार मिळेल त्यामुळे त्याचा विकास होईल असा ग्रामस्थांचा समज होता. व्यवस्थापनाने जागा संपादन केल्यानंतर टोलवाटोलवी केली, असा ग्रामस्थांच म्हणणे आहे.

आज गावात अनेक तरुण बेकार आहे, मात्र व्यवस्थापनाने भूमिपत्रांना डावलून खोपोली शहराच्या बाहेरून आलेल्या ना रोजगार दिला त्याचप्रमाणे कारखान्यातील ठेकेदारी सुद्धा दिली असे ग्रामस्थांचा म्हणणे आहे. तरीपण नियोजित प्रकल्पात आम्हा ग्रामस्थांना सामावून घ्यावे या ठिकाणी देण्यात येणारा रोजगार व ठेकेदारी येथील बेरोजगार तरुणांना देण्यात यावी अशी ही मागणी यावेळी करण्यात आली आहे.

भविष्यात व्यवस्थापनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर शांततेने आंदोलन करण्याचा इरादा ग्रामस्थांच्या ग्रामसभे त घेण्यात आला. या निवेदनाच्या प्रती उद्योग मंत्री उदय सामंत, रायगड जिल्हाधिकारी, कोकण आयुक्त, तहसीलदार खालापूर, खोपोली पोलीस ठाणे इत्यादी ठिकाणी देण्यात आल्याचे समीर शिंदे व किशोर पाटील यांनी या वेळी बोलताना सांगितले.



**नागोठणे : रजिपचे माजी विरोधी पक्षनेते तथा भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांना वाढदिवसानिमित्त नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, तालुका सरचिटणीस आनंद लाड, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शेखर गोळे, अशोक अहिरे, धनराज उमाळे, विवेक रावकर, राजन दुबे, अंकुश सुटे, शीतल नांगरे, प्रियांका पिंपळे आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# शेतकऱ्यांकडील पशुधनाच्या संख्येत घट

**तळा : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांकडे असलेले पशुधन वाढण्या ऐवजी त्याच्यामधे मोठ्या प्रमाणात घट होऊ लागली आहे. यामुळे भविष्यात (शेणखत) येथील शेतीमध्ये सेंद्रिय खताचा अभाव तर दिसून येईल, परंतु गावोगावी मिळणारे गायी, म्हशीच्या दुधा ऐवजी दुध पिशवी व दुधाच्या पावडरचे प्रमाण वाढले आहे. यामुळे ग्रामीण भागात घरोघरी मिळणारा दुध व दुग्धजन्य पदार्थ यावर परिणाम झालेला असून ही एक मोठी समस्या निर्माण होताना दिसत आहे.

अंदाजे पंधरा वर्षांपूर्वी गावागावातून प्रत्येक शेतकऱ्याकडे चार पाच गुरे ही असायची. त्यामुळे प्रत्येक घरात दुध मिळायचे. दही,ताक, तुपही गावात मिळायचे त्याच बरोबर शेतीसाठी सेंद्रिय खत (शेणखत) मोठ्या प्रमाणात उपलब्ध असायचा शेतीत रासायनिक खता ऐवजी सेंद्रिय खतच मोठ्या प्रमाणात वापरला जायचा ज्यामुळे भातपीक, नाचणीपीक, मोठ्या प्रमाणात येऊन जीवनसत्व युक्त अन्न मिळायचे या विविध पिकांमधून माणसाला लागणारे घटक या अन्नातून मिळत होते.

गावागावातून प्रत्येक शेतकऱ्यांकडे कमीतकमी चार गुरे असायचीच त्यामधे नागंरणीसाठी दोन बैल व दुधासाठी दोन गाई कीवा म्हशी असायच्या आता गावोगावी पाहीले तर एखाद दुसऱ्या शेतकऱ्याकडे गुरे असतात. तीही गावात पाहिले तर हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढीच आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

राणेचेवाडीचे भास्कर गोळे शेतकरी यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की पुर्वी घरोघरी पाचसहा गुरे असायचीच दुध भरपूर असायचे, परंतु आता गुरांच्या होणाऱ्या चोऱ्या तसेच दुधाळ जनावरांच्या वाढलेल्या किंमती व वाढलेले खाद्याचे दर यामुळे दुधाचा व्यवसाय शेतकऱ्यांसाठी फायदेशीर राहीलेला नाही यामुळे दुधाळ जनावरांची संख्या कमी झाली शेतीच्या कामांना यंत्राचा झालेला वापर व गावाकडील स्थलांतर आशा कारणांमुळे गुरांची संख्या घटत आहे.




## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भिंगार, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार १. सुनिता आंबो पवार २. गोमा मारूती पाटील ३. दत्तु मारूती पाटील ४. माणिक मनोहर शेंद्रा, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:–

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे भिंगार, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| ५/६ | १ | ०–०६–५० | ०–०७–९० | ०–१४–४० | ०.९४ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०४/११/२०२५**

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**

**कार्यालयीन पत्ता**
**गाळा क्रं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**संपर्क :– ८८८८२७१७५९**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भेरले, तहसील– पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार १. सुनिता आंबो पवार २. गोमा मारूती पाटील ३. दत्तु मारूती पाटील ४. माणिक मनोहर शेंद्रा, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:–

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे भेरले, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| १५/२ | १ | ०–३०–३० | ०–००–०० | ०–३०–३० | ५.८१ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०४/११/२०२५**

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**

**कार्यालयीन पत्ता**
**गाळा क्रं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**संपर्क :– ८८८८२७१७५९**


# प्रलंबित मागण्या पूर्ण करा

## वकिलवर्गाची शासनाकडे मागणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे वकिलांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी (दि. ४) लाल फिती लावून काम करून काम केले. बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या आवाहनानुसार हा पवित्रा घेण्यात आला होता.

या आंदोलनात रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांतील वकिलांनी सहभाग नोंदवला. वकिलांनी नियमित न्यायालयीन कामकाज पार पाडत असतानाच लाल फिती लावून शासनाने ॲड. प्रोटेक्शन ॲक्ट तातडीने मंजूर करण्यात यावा या मुख्य मागणी साठी व शेवगाव येथील वकिलांवर झालेल्या प्रणघातक हल्ल्याचा निषेध करण्यात आला आहे.

अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांनी सांगितले की, आम्ही आज लाल फिती लावून शांततेत निषेध नोंदवला आहे. आमच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. तथापि, वकिलांच्या लाल फिती लावून केलेल्या या आंदोलनाची सर्वत्र चर्चा रंगली असून शासनाने याकडे गंभीरपणे लक्ष द्यावे, अशी सर्वसामान्यांचीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या वेळी बार असोसिएशनचे उपाध्यक्ष अनंत पाटील, सचिव अमित देशमुख, खजिनदार राजेंद्र माळी, सदस्य अजहर घट्टे, जेष्ठ वकील तसेच नवोदित वकील हजर होत्या.


## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

**जाहीर सूचना**

जनहित याचिका क्र. ७१/२०१३ Interim Application (Lodgin) No.२९११९ of २०२५ अंतर्गत मा. उच्च न्यायालयाने दि.१३/१०/२०२५ रोजीचे न्यायालयीन आदेशान्वये सुचना जारी केलेल्या आहेत. त्यानुसार रस्त्यावरील खड्डे बाबत मा. उच्च न्यायालयाने सर्व सामान्य जनतेस त्यांचे तक्रारी संदर्भात दाद मिळावी याकरीता समिती गठीत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने नागरीकाचे सोईचे दृष्टीकोनातून पनवेल महानगरपालिका द्वारे समिती गठित करण्यात आलेली आहे. त्याबाबतची प्रसिध्दी पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर करण्यात आलेली आहे.

नागरीकांचे सोईचे दृष्टीकोनातुन पनवेल महानगरपालिकेने विभाग निहाय स्वतंत्र कक्ष निर्माण केलेले असून रस्त्यावरील खड्डे बाबत नागरीकांना तक्रारी दाखल करण्याचे अनुषंगाने विभाग निहाय खालील कनिष्ठ अभियंता यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती केलेली आहे

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्रभाग क्र. /प्रभागाचे नाव | नोडल अधिकारी | भ्रमणध्वनी व व्हाट्सअप क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | नावडे उप विभाग | १,२,३ | श्री. आशिष भास्करराव आरिकर | ९९६०९६९९४४ |
| २ | खारघर | ४,५,६ | श्री. अमोल अनंत नाईक | ९८३३९५४१३७ |
| ३ | कळंबोली | ७,८,९,१०,१५,१६ | श्री. शुभम अशोक रवंदळे | ७०२०४८५१५७ |
| ४ | कामोठे | ११,१२,१३,१४ | श्री. धनराज भगतशिंग राजपूत | ८४२१८०६१०६ |
| ५ | पनवेल, नवीन पनवेल व काळुंद्रे विभाग | १७,१८,१९,२० | श्री. सोमेश अनिल शिंदे | ९६३७११३९६९ |

सर्व जनतेस या द्वारे आवाहन करण्यात येते की, रस्त्यावरील खड्डेबाबत तक्रार नोंदविण्याकरीता पनवेल महानगरपालिकेने नागरीकांकरीता खालील सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

१. पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ www.panvelcorporation.com
२. मनपा मेल आयडी – panvelcorporation@gmail.com
३. रस्ता दुरुस्ती तक्रार संदर्भात कार्यालयीन दूरध्वनी क्र. ०२२–२७४५८०४०/४१/४२
४. टोल फी क्र. १८००२२७७०१.
५. Panvel Connect App.-Helpline Number ८९६०९१६०९१.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त,I**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५६७/५८८/२०२५**
**दिनांक :– ०४/११/२०२५**

## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, पत्ता ६३०, डी विंग, डिस्मा बिल्डिंग, केडब्लूसी, कळंबोली, नवी मुंबई | ०५ गुलमोहर झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील गुरूकृपा हॉटेल समोरी बीमा चौक, कळंबोली येथील ०५ गुलमोहर झाडे हे रस्त्याच्या मध्ये असुन, रहदारीस अडथळा, मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून. धोकादायक स्थितीत आहेत. |
| २ | पोटे रियल्टी तर्फे प्रतिक प्रकाश पोटे., प्लॉट नं. ३७, सेक्टर–०९, कामोठे. | ०१ बोर व ०१ गुलमोहर अशी एकूण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.–३७. सेक्टर– ०९, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथील ०१ बोर व ०१ गुलमोहर अशी एकूण ०२ झाडे हे वाहने आत बाहेर (ये जा) करणेस बाधित होत असुन, धोकादायक स्थितीत असल्याने. |
| ३ | M/s. Niru Engineering & Services Private Ltd., 1" Flooor, "Niru Niketan", Plot No.- 3. Sector No.- 18A, Nerul, Navi Mumbai 400 706. | ०१ गुलमोहर झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ३९६ बी. सेक्टर KWC. नोड कळंबोली, ता. पनवेल. जि. रायगड येथील ०१ गुलमोहर झाड हे धोकादायक स्थितीत असुन, नवीन इमारतीच्या बांधकामात बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अर्धानियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५६०/५८२/२०२५**
**दिनांक :– ०४/११/२०२५**

**सही/–**
**उपायुक्त**
**(तथा वृक्ष अधिकारी)**
**पनवेल महानगरपालिका**

# मध्यरात्रीतून ११ टन कचरा गोळा

## वर्ल्डकप क्रिकेट सामन्यानंतर पालिकेची स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघावर मात करीत महिला क्रिकेट विश्वचषकावर आपले नाव कोरले आणि समस्त भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारतीय संघ अंतिम फेरीत पोहचल्यानंतर लगेचच या सामन्याची तिकीटे आरक्षित झाली. या सामन्याला होणारी क्रीडा रसिकांची मोठ्या प्रमाणावरील उपस्थिती लक्षात घेता नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सामन्यानंतर डॉ.डी.वाय. पाटील स्टेडियम भोवतालच्या





परिसराची साफसफाई करण्याची विशेष मोहीम रात्रीच राबविण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे आणि नेरूळ विभागातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांच्या माध्यमातून चाळीसहून अधिक स्वच्छताकर्मींच्या सहयोगाने राबविण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेत ११ टन कचरा गोळा करून तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी लगेच वाहून नेण्यात आला.

यापूर्वीही आयसीसी महिला क्रिकेट विश्वकप चषक २०२५ स्पर्धेतील डॉ.डी.वाय. पाटील स्टेडियम येथे दि. २०, २३, २६, ३० ऑक्टोबर रोजी झालेल्या सामन्यांच्या वेळी मध्यरात्री सफाई मोहीम राबविण्यात आली होती. याप्रमाणेच २ नोव्हेंबरला झालेल्या अंतिम सामन्याच्या वेळीही रात्रीपासून पहाटेपर्यंत विशेष स्वच्छता मोहीम राबवून स्टेडिअम भोवतालचा परिसर स्वच्छ करण्यात आला. स्वच्छ शहर म्हणून नावाजल्या जाणाऱ्या नवी मुंबईच्या नावलौकिकाला साजेसे काम या माध्यमातून केले जात आहे, ज्या मोहीमेची नागरिकांकडूनही प्रशंसा केली जात आहे.

# सीबीडीत योगा प्लॅटफॉर्म आणि निवारा शेड कामांचे भूमिपूजन

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीमधून रु. २५ लाख उपलब्ध करून सीबीडी बेलापूर येथील दुर्गा माता नगर येथे सभामंडपाचे, तसेच आमदार निधीमधूनच २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून लायन्स पार्क उद्यान येथे योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेड बांधकामाचे भूमिपूजन सोहळा उत्साहात झाले. या दोन्ही विकासकामांच्या भूमिपूजन सोहळ्याचे उद्घाटन भाजपा महामंत्री नवी मुंबई व माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांच्या हस्ते पार पडले.

आमदार मंदा म्हात्रे यांनी आपल्या आमदार निधीमधून सातत्याने त्यांच्या बेलापूर विधानसभा मतदारसंघात विविध



नागरी विकासकामांना कायम प्राधान्य दिले असून, सदर या दोन्ही कामांच्या माध्यमातून बेलापूर विधानसभा क्षेत्रातील सर्वांगीण विकासाची दिशा अधिक बळकट झाली आहे.

या वेळी भाजपा महामंत्री नवी मुंबई व माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांच्या समवेत भाजप बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ता मनोहर बाविस्कर, प्रभाकर कांबळे, मलेश राठोड, संजय ओबेरॉय, जयदेव ठाकूर, जयराम पासवान, राजू कोळी, मनी कोणार, रायचंद जैन, कल्पेश कुंभार, निलेश पाटील, विशाल डोंगरे, अजय पासवान, भारतीय योग संस्था अध्यक्ष पुरणजी, एलयेवार, सरिता पवार, सुधेश शर्मा, अलका कामत, सुरेखा बामनकर, देवयानी मुकादम चैताली ठाकूर तसेच भारतीय योग संस्थेमधील ज्येष्ठ नागरिक वर्ग, महिला वर्ग व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले बांधणीत साईकृपा, ज्ञानेश्वर, अष्टविनायक सोसायट्यांचे यश



**नवी मुंबई : बातमीदार**

दरवर्षीप्रमाणे सलग पाचव्या वर्षी सिवूड्स करावे नगर विभागामद्धे धर्मवीर संभाजीराजे चॅरिटेबल ट्रस्ट आणी राजमाता जिजाऊ महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दत्ता घंगाळे व अश्विनी घंगाळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजित किल्ले बांधणी स्पर्धा तसेच रांगोळी स्पर्धा यांचा बक्षीस वितरण समारंभ झाला.

किल्ले बांधणी स्पर्धेत साईकृपा सोसायटी सेक्टर ४६, ज्ञानेश्वर माऊली सोसायटी, अष्टविनायक सोसायटी सेक्टर ४८, यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक पटकावले व रांगोळी स्पर्धेत अमेय परुळेकर, शिवदर्शन सोसायटी सेक्टर ४८, संजना जाधव, अष्टविनायक सोसायटी सेक्टर ४८, सेजल पालवे, साईधाम सोसायटी सेक्टर ४८ यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, व तृतीय पारितोषिक पटकावले.

दोन्ही स्पर्धेसाठी स्वतंत्ररित्या प्रथम, द्वितीय, तृतीय असे अनुक्रमे सात हजार रोख सन्मान चिन्ह, पाच हजार रोख सन्मानचिन्ह, तीन हजार रोख सन्मानचिन्ह असे पारितोषिक स्वरूप होते. तसेच सहभागी प्रत्येक स्पर्धकांस उत्तेजनार्थ पारितोषिक वितरण करण्यात आले. सुमारे दोन्ही स्पर्धेत एकूण २५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. यामध्ये युवा वर्ग, महिला भगिनी तसेच लहान मुले मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले.

या कार्यक्रमावेळी स्पर्धेचे संयोजक सुधीर जाधव, कैलास तरकसे, विकास नलावडे, यासह नरेंद्र खिल्लारी, विश्वनाथ बेलोटे, अरुणा अंबोरे, जिजाभाऊ शेळके, दादासाहेब खराडे, रुपेश मोरे, नांदगावकर, अजय गुडेकर, दीपक बेलोसे यासह विविध सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बालनाट्य अभिनय कार्यशाळेचा समारोप

**नवी मुंबई : बातमीदार**

रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५ नवी मुंबई बालारंगभूमी आणि संत शिरोमणी कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने नाटककार श्रीहरी पवळे यांनी मार्गदर्शन केलेल्या बालनाट्य अभिनय कार्यशाळेचा समारोप दोन नोव्हेंबर २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह येथे सकाळी अकरा वाजता झाला.

गेली २९ वर्ष बालनाट्य कार्यशाळेचा उपक्रम सतत सुरू ठेवणे अनेक संकटांना सामोरे जाऊन उपक्रमाचे अखंड सातत्य ठेवणे नवी मुंबईच्या इतिहास लिहिला जाईल तेव्हा या उपक्रमाची नोंद घेतली जाईल असे उद्गार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नंदकिशोर जोशी अध्यक्ष छत्रपती शिक्षण मंडळ अप्पा जोशी प्रतिष्ठान नवी मुंबई यांनी काढले. याप्रसंगी जेष्ठ रंगकर्मी रवींद्र आवटी, अशोक पालवे, शिवतुतरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.रवींद्र पाटील

ऐतिहासिक मालिकांमध्ये काम करणारे अभिनेते गणेश वाघमारे, उद्योजिका अर्चना खरात कवयित्री सुचिता खाडे उपस्थित होते. दिवाळी सुट्टीतील या बालनाट्य



शिबिरात एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शिबिरातील बालकलाकार श्रीमयी लाडके शिबिराविषयी अनुभव कथन करताना विविध पैलूंचा कसा अभ्यास करावा व सराव करावा याचा आम्हाला खूप फायदा होतो असे नमूद केले त्याचबरोबर पालक ज्योत्स्ना बाणखेले यांनी शिबिरातील आलेले अनुभव सांगताना माझ्या मुलींमध्ये वागण्यात अभ्यासात किती बदल झाला व आत्मविश्वास कसा वाढला असे नमूद केले.

या वेळी प्रमुख पाहुण्यांचे हस्ते शिबिरार्थींना प्रमाणपत्र देऊन गौरविले शिबिरार्थींनी सादर केलेल्या प्रयोगक्षम संदेश देणाऱ्या बालनाटिका यावेळी सादर केल्या. माय मराठी, शूटिंग शूटिंग, आणि सावधान आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला त्याचा धागा पकडून अजूनही अतिदुर्गम भागात मराठी भाषा पोहोचविण्यासाठी केलेले सादरीकरण अप्रतिम झाले. तसेच शूटिंग शूटिंग या बालनाट्यातून एखादी कला विकत घेता येत नाही ती उपजत असावी लागते असा आशय असणारी बालनाटिका सादर झाली. त्यानंतर सावधान या बालनाटिकेतून लहान मुले आणि मोबाईल यावर प्रकाश टाकण्यात आला लहान मुले मोबाईलच्या किती आहारी गेली त्यातून होणारे आजार दुष्परिणाम यावर भाष्य करणारी आणि संस्कार किती महत्त्वाचे आहे हे दाखविले उपस्थित सर्व पाहुणे आणि पालकांनी या तीनही संदेश देणाऱ्या बालनाटिकांचे कौतुक केले या शिबिराचे मार्गदर्शक नाटककार श्रीहरी पवळे यांनी संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी विद्यार्थ्यांना देऊन एक आगळावेगळा पायंडा पाडला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिशा खरात, प्रमाणपत्र वाचन व आभार प्रदर्शन प्रारंभी पालेकर स्वागतगीत स्वरा साळवी. नृत्य सादरीकरण युक्ता अहिरे, साक्षी शिंदे, पार्श्व संगीत राहुल मोहन अहिरे. प्रकाश योजना सौरभ धुमाळ व्यवस्थापन तन्वी शिंदे उद्योजिका अर्चना खरात यांचे सहकार्य लाभले. पालकांनी श्रीहरी पवळे सरांचे शिबिर यशस्वी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.



# निवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सेवेतून ऑक्टोबर महिन्यात निवृत्त होणाऱ्या १० अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांचा सेवानिवृत्ती सन्मान समारंभ महापालिका मुख्यालयात ज्ञानकेंद्रामध्ये संपन्न झाला. यावेळी महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहा. आरोग्य अधिकारी रत्नप्रभा चव्हाण, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी विजय रांजणे आदी मान्यवर तसेच इतर अधिकारी, कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटूंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी नवी मुंबई महानगरपालिका सेवेतून ऑक्टोबर महिन्यात निवृत्त होणारे अधिक्षक दिलीप वाघमारे, अधिक्षक राहुल पगारे, अधिक्षक प्रदिप सकपाळ, वरिष्ठ लिपिक मोहन बनसोडे, लिनन किपर श्वेता जाधव, आया कोकीळा अवचारे, माळी प्रमोद जाविर तसेच मुख्याध्यापिका निमा ठाकूर व रवींद्र म्हात्रे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान करण्यात आला तसेच स्वेच्छानिवृत्ती स्विकारणारे अग्निशमन केंद्र अधिकारी विवेक भगवान म्हात्रे अशा १० अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# १ डिसेंबरला नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या अनुषंगाने आज, ३ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनात प्राप्त एका अर्जावर सुनावणी घेउन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अतिक्रमण विभागाला कार्यवाहीचे आदेश दिले.

या पुढील माहे डिसेंबर महिन्याचा लोकशाही दिन दि. ०१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज निवेदनाच्या दोन प्रतींमध्ये १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://nmmc.gov.in यावर विभाग सेक्शनमध्ये माहिती व जनसंपर्क विभाग अंतर्गत सामान्य माहिती लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. नागरिक आहे त्या ठिकाणाहून एक क्लिकवर अर्ज नमुना प्रत सहजपणे ऑनलाईन डाऊनलोड करु शकतात.

# उरण व मोरा सागरी पोलीस ठाण्यातर्फे राष्ट्रीय एकता दिवस

**उरण : बातमीदार**

प्रत्येक भारतीय साठी ३१ ऑक्टोबर हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे कारण हा दिवस म्हणजे स्वतंत्र भारताचे शिल्पकार,देशाचे पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आहे. त्यामुळे संपूर्ण देशभरात हा दिवस संपूर्ण देशात 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. एकता आणि अखंडता हे कोणत्याही राष्ट्राच्या अस्तित्वाचा आणि प्रगतीचा आधारस्तंभ आहे.हा संदेश या दिनाच्या माध्यमातून आपल्याला मिळतो. संपूर्ण देशभरात हा दिवस साजरा होत असताना उरण तालुकाही त्याला अपवाद नसून उरण आणि मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून उरण शहरांतून एकता दौड रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.





एकता दौड पेन्शन पार्क, उरण या ठिकाणाहून सकाळी ७:३०वाजता सुरू होऊन पुढे स्वामी विवेकानंद चौक, गांधी पुतळ्या समोरून गणपती चौक, राजपाल नाका मार्गाने पालवी हॉस्पिटल समोरून कामठा मार्गे एन आय हायस्कूल- पुन्हा स्वामी विवेकानंद चौक मार्गाने पेन्शन पार्क, उरण या ठिकाणी ८:१५ वाजता संपन्न झाली.

या एकता दौड करिता उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी पो.नि संजय जोशी, ०५ स.पो. नि/पो.उपनि, ४५ अंमलदार तसेच मोरा सागरी पोलीस ठाण्याचे ०२ स.पो.नि/पो. उपनि, २० अंमलदार व २०० ते २५० प्रतिष्ठित नागरिक, माजी नगरसेवक, पोलीस पाटील, सागर रक्षक दल सदस्य, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

प्रत्येक भारतीयासाठी ३१ ऑक्टोबर हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हा दिवस म्हणजे स्वतंत्र भारताचे शिल्पकार, पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आहे. त्यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून, हा दिवस संपूर्ण देशात 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. एकता आणि अखंडता हे कोणत्याही राष्ट्राच्या अस्तित्वाचे आणि प्रगतीचे आधारस्तंभ आहेत त्यांच्या स्मृतिदिनी, आपण सर्व भारतीयांनी, त्यांनी पाहिलेल्या अखंड आणि मजबूत भारताचे स्वप्न साकार करण्याची प्रतिज्ञा करावी. देशाची एकता आणि अखंडता जपण्यासाठी सदैव तत्पर राहणे, हीच 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांना खरी आदरांजली ठरेल, असे उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांनी सांगितले.

# गोडी अभंगाची अभंगसंग्रहाचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

कार्तिकी एकादशीच्या पवित्र दिवशी, २ नोव्हेंबर २०२५ रोजी, अस्मिता साहित्य संस्कृती आणि कला मंडळ, नवी मुंबई यांच्या वतीने एक भव्य गुणगौरव महोत्सव २०२५ पार पडला. या कार्यक्रमात गोडी अभंगाची या अभंग संग्रह पुस्तकाचे प्रकाशन तसेच राज्यस्तरीय अभंग लेखन स्पर्धा २०२५ आणि राज्यस्तरीय दिवाळी उत्सव स्पर्धा २०२५ यांचे पारितोषिक वितरण समारंभ पार पडले.

प्रकाशन सोहळा राजसा प्रकाशन यांच्या माध्यमातून संपादिका सुचिता खाडे प्रकाशित गोडी अभंगाची अभंग संग्रह छत्रपती शिवराय प्रतिष्ठान व शिवजयंती उत्सव समिती चे संस्थापक-अध्यक्ष सागर शिवाजी पावगे यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. सुनील सावंत यांनी भूषवले. डॉ. शांताराम कारंडे,



डॉ. बाळकृष्ण लळीत यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला

राज्यस्तरीय अभंग लेखन स्पर्धेचे परीक्षक ह.भ.प. राहुल ताम्हणे, ह.भ.प. दिनेश औटी व ह.भ.प. हनुमंत जगताप यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

राज्यस्तरीय दिवाळी उत्सव स्पर्धेचे परीक्षक सौ. मीरा आगरकर व श्री. श्रीहरी पवळे सर यांनी गीत गायन, कथाकथन आणि कविता पठण या स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली. डॉ. बाळकृष्ण लळीत यांनी उपस्थित कवी-कवयित्रींना संत साहित्यावर मार्गदर्शन केले.

सौ. मेरा आगरकर यांनी गीतगायनाचे तंत्र, तर श्रीहरी पवळे यांनी कथाकथनाची शैली यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या राज्यस्तरीय उपक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात कवयित्री सुचिता बागडे खाडे यांनी दिवाळी सणावर आधारित भावकविता सादर करून उपस्थितांना भारावून टाकले. हा सोहळा भक्ती, साहित्य आणि संस्कृती यांचा सुंदर संगम ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र पाटील यांनी केले, आणि आयोजन, अस्मिता साहित्य संस्कृती आणि कला मंडळ, नवी मुंबई, कार्यकारिणी शा

गणेश खाडे, सुचिता खाडे, अनिल सोनवणे, रुपेश राणे, सुमित जैन, माधुरी बागडे, श्वेता मांदाडकर, पुजाली शिंदे, सुप्रिया मंगरुळे, नीलम पोळ, सुरेखा बागडे यांच्या वतीने करण्यात आले.

# गाढेश्वर महादेव मंदिराजवळ नवीन वास्तूचे भूमिपूजन

**पनवेल : वार्ताहर**

राजस्थान रीजनल युनिटी असोसिएशन, नवी मुंबई यांच्या वतीने राजपूत समुदायाच्या जमिनीवर हवन, यज्ञ आणि भूमिपूजन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम नवीन पनवेल येथील गाढेश्वर महादेव मंदिर मार्गावर झाला आणि त्यात समाजातील सदस्य आणि महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात हवनाने झाली. ज्येष्ठ सदस्य आणि महिलांनीही यज्ञ अर्पण केले. महंत देवीदास महाराज (हनुमान दास जी यांचे धुनी, घानेराव) उपस्थित होते. ते म्हणाले, राजपूत समुदायाची एकता ही त्याची सर्वात मोठी ताकद आहे. जेव्हा समुदाय एकजूट असतो तेव्हा कोणतेही ध्येय अशक्य नसते. ही जमीन येणाऱ्या पिढ्यांसाठी उज्ज्वल भविष्याचा पाया बनेल. या कार्यक्रमाने समुदाय इमारतीच्या बांधकामाची सुरुवात झाली. दुपारी



भूमिपूजन झाले, त्यानंतर संघटनेने जमीन दान करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान केला. संघटनेचे संस्थापक लाल सिंह चुंडावत टंका यांनी जमीन खरेदी प्रक्रियेची आणि भविष्यातील योजनांची माहिती दिली. ते म्हणाले, ही जमीन केवळ मातीचा तुकडा नाही, तर येणाऱ्या पिढ्यांच्या आपल्या ओळखीचे, स्वाभिमानाचे आणि स्वाभिमानाचे केंद्र बनेल. येथे राजपूत समुदायाची इमारत, सामुदायिक सभागृह आणि शैक्षणिक उपक्रमांचे केंद्र स्थापन केले जाईल. कार्यक्रमाचे संचालन उदय सिंह देवदा डिंगर यांनी केले.

या वेळी पनवेलमधील माताजी भंडारा ग्रुपतर्फे राजेंद्र बोहरा यांनी महंत देवीदास महाराज, लाल सिंह चुंडावत, वीरेंद्र सिंह पंवार, इंदरसिंह चुंडावत आदींना शाल, श्रीफळ देऊन विशेष सत्कार केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेत संयोजक प्रेम सिंह कुमावत, गणपत सिंह मेदतिया, वीरेंद्र सिंह पंवार इंदर सिंह चुंडावत, महेंद्र पुरोहित यांच्यासह संघटनेच्या सदस्यांनी योगदान दिले. प्रसादाचे मोठ्या प्रमाणात वाटप आणि एकतेची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

# गेल टॉवरबाधित गंगावणे बोरावाडीतील शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

## निवेदनाद्वारे मांडल्या व्यथा; न्याय मिळवून देण्याची मागणी

**नागोठणे : बातमीदार**

गॅस ऑथरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (गेल) कंपनीच्या २२० केव्ही क्षमतेच्या ट्रान्समिरान लाईन टाकताना नागोठणेजवळील कुहिरे व शिहू ग्रामपंचायत हद्दीतील मौजे गंगावणे बोरावाडी गांधेकातकरवाडी या आदिवासी भागातील शेतकरी बांधवांना पूर्वसूचना व कोणताही मोबदला न देता त्यांच्या जमिनी बळजबरीने बळकावून टॉवर्स उभरण्यात आले असा त्यांचा आरोप आहे. आमच्या दळी जमिनी नष्ट होऊन उपासमारीची वेळ आली आहे, असेही त्यांनी जिल्हाधिकारी किशान जावळे यांना निवेदन देतेवेळी सांगितले.



वन हक्क कायद्यानुसार वन हक्क प्राप्त जमिनिंवर कोणततही प्रकल्प राबविण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीमधून ग्रामसभेच्या माध्यमातून संमती घेणे गरजेचे असते तसेच वनविभागाच्या व महसूल विभागाच्या माध्यमातून पंचनामा करणे अनिवार्य असते. शिहू हद्दीतील गट. नं. ४२, ४३, ४४ यापैकी सामूहिक क्षेत्र ३७.१० टक्के दळी जमीन ही आदिवासी बांधवांना शासनाने वाडवडिलांपासून उदरनिर्वाहासाठी दिली आहे. या जमिनीत भात, नाचणी, वरी तसेच इतर भाजीपाल्याचे पीक घेऊन येथील आदिवासी बांधव हे आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करत आहेत. इतर कोणते उत्पनाचे साधन नसल्यामुळे कुटुंबाचे पोट या जमिनीवर अवलंबून आहे, मात्र गेल इंडिया कंपनीच्या टॉवरचे काम शेतीत सुरु आहे. हे काम सुरू करण्यापूर्वी कंपनीने आदिवासी शेतकऱ्यांची सहमती न घेता बेकायदेशीरपणे टॉवर उभारले आहेत, असा त्यांचा आरोप आहे.

अनुसूचित जमातीच्या हक्कानुसार आदिवासी वनजमिनीवर वस्ती करण्याचा व त्यावर उपजीविका चालविण्याचा अधिकार तेथील आदिवासी समाजाला आहे. टॉवर लाईनचे काम सुरु करण्यापूर्वी तेथील शेतीचे पंचनामे करून योग्य तो मोबदला देणे बंधनकारक असताना असे काही न करता शेतीतून इलेक्ट्रिक टॉवर लाईनचे काम करून अज्ञानाचा फायदा घेऊन आमची आर्थिक फसवणूक केली आहे. वाडवडिलांची जमीन अशी नेस्तनाबूत झाल्यामुळे येथील कुटुंब उघड्यावर पडली आहेत. शेतीच्या नुकसानभरपाईची मागणी येथील संबंधित नेमलेल्या ठेकेदारांकडे केली असता अरेतुरेची भाषा वापरून हिनतेची वागणूक दिली जात असल्याचे बाधित शेतकऱ्यांनी सांगितले.

बाधित शेतकऱ्यांनी सोमवारी (दि. ३) रायगड जिल्हाधिकारी जावळे यांची भेट घेऊन आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत निवेदन देऊन व्यथा मांडल्या आहेत. आम्ही आदिवासी ठाकूर असलो म्हणून काय झाले, आम्हीसुद्धा माणसे आहोत. ठाकूर म्हणून आमच्या जातीचा व आमचे खच्चीकरण गेल इंडिया कपंनी करीत आहे. आमचे हक्क मागण्याचे आम्हाला राज्यघटनेनी अधिकार दिले असल्याचे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात बाधित शेतकऱ्यांनी म्हटले आहे. आम्हा शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. त्याला शासन नियमाप्रमाणे न्याय द्यावा, अशी विनंती बाधित शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# उसर बु. ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश

## साई पं.स. गणात रचना थोरे यांच्या उमेदवारीसाठी प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माणगाव तालुक्यामध्ये विविध पक्ष जोरदार मोर्चेबांधणी करत असून तळाशेत जिल्हा परिषद गटातील साई पंचायत समिती गणामध्ये भाजपला जनतेची उत्स्फूर्त पसंती मिळत असल्याचे चित्र आहे.

विविध गावांच्या पक्षप्रवेशानंतर मंगळवारी (दि.४) उसर बुद्रुक ग्रामस्थांनी आपल्या दोन्ही विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांसहित गावचे अध्यक्ष अशोक कान्हेरे व मुंबईकर मंडळ अध्यक्ष, सर्व कमिटी आणि ग्रामस्थांसहित युवा नेते जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, ज्येष्ठ नेते किसन महाडिक यांच्या प्रयत्नाने भाजपत प्रवेश केला.

या वेळी ग्रामपंचायत सदस्य अश्विनी कान्हेरे, सारिका संतोष जाधव तसेच सुरेश कातूर्डे, मनोहर निगडे, चंद्रकांत निगडे, प्रफुल्ल कातूर्डे, संजय महाडिक, संतोष निगडे, दीपेश कातूर्डे, जितेंद्र पवार, शरद निगडे, मनोहर कातूर्डे, संतोष राऊत, सचिन भुवड, महेश पवार, नितीन खांडेकर, गणेश निगडे, शैलेश पातेरे, जितेंद्र पवार, दयाराम महाडिक, दीप कातूर्डे, भास्कर बाईत, सुधाकर कातूर्डे, विजय बाईत, विशाल बांद्रे, संतोष जाधव, राजेश खातू, दिनकर महाडिक, रेश्मा पवार,इंदुमती महाडिक, राधिका निगडे व इतर ग्रामस्थांनी पक्षप्रवेश केला.

युवा नेते निलेश थोरे यांच्यासमवेत सुधीर म्हामुणकर व किसन महाडिक यांच्या माध्यमातून हा पक्षप्रवेश झाला असून या वेळी केवळ गावातूनच नव्हे; तर पूर्ण ग्रामपंचायतीमधून जास्तीत जास्त मतदान हे रचना थोरे यांना करणार असल्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.



# शेती कसणाऱ्या लोकांनासुद्धा नुकसानभरपाई देण्याची मागणी





**मुरुड : प्रतिनिधी**

सतत पडणाऱ्या पावसामुळे मुरुड तालुक्यातील भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. उभे भातपीक आडवे झाल्याने शेतकऱ्यांची वर्षभराची मेहनत वाया गेली आहे.

बहुतांश शेतकरी शेकडो वर्षपासून शेती कसतात, परंतु कागदोपत्री पुरावा त्यांच्याकडे नाही. काही शेतकरी स्वतः जमिनीत भातपीक न लावता दुसऱ्या शेतकरी बांधवास शेत लावण्यास देतात. जो शेत कसत आहे त्या शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळाली पाहिजे, अशी प्रमुख मागणी घेऊन आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीचे मुरुड तालुका अध्यक्ष ॲड. विनायक शेडगे यांनी तहसीलदार आदेश दफळ यांना निवेदन दिले. यावेळी त्यांच्यासोबत शेतकरीसुद्धा होते.

या निवेदनातून मागणी करण्यात आली आहे की, आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी मुरुड तालुका अध्यक्ष म्हणून मी, शेती कसत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावाने प्रत्यक्ष पाहणी करून शासनाने पंचनामा करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी आम्ही केली असल्याचे विनायक शेडगे यांनी सांगितले आहे.

पंचनामे सातबाऱ्यावर नाव असणाऱ्या व तोच शेती कसत असेल तर त्याचा पंचनामा होणे गरजेचे आहे, पण पिढ्यान् पिढ्या जे माझे कष्टकरी ऊन, पाऊस, वारा या गोष्टीची पर्वा न करता शेती कसतात व त्या शेतीवर आपल्या कुटुंबियांचे पालन पोषण करतात. कसेल त्याची जमीन या न्यायी कुळ कायद्याने जमिनीचे, शेतातील भात पिकाचे पंचनामे व्हावे व शेती कसणाऱ्याला न्याय मिळाला पाहिजे. त्यांच्या नावाने पंचनामे होत नाहीत. मग शासनाने जो लावलेला निकष आहे त्यात बदल करून प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला फायदा देण्यात यावा, अशी आमची न्यायिक मागणी असल्याचे शेतकरी प्रबोधिनीतर्फे करण्यात आली आहे.

कुळ कायद्याप्रमाणे आमच्या स्थानिक शेतकऱ्यालासुद्धा न्याय मिळावा अशी मागणी आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीचे मुरुड तालुका अध्यक्ष ॲड. शेडगे यांनी केली आहे.

# आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार तुकाराम सुर्वे यांच्या स्मरणार्थ तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, कर्जत, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद आणि नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर व मोफत औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात ३१० रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रतिष्ठानने आयोजित केलेले ३६वे आरोग्य शिबिर होते.



या शिबिराचे उद्घाटन ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, डॉ. ज्योती सातपुते, मनीषा सुर्वे, बिपीन गडकरी, प्रभाकर करंजकर, गिरीश देशमुख, किरण पाटील, वसंत ठाकूर आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना मुकेश सुर्वे यांनी, आम्ही कर्जत तालुक्यासह अन्य ठिकाणी मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरे आयोजित करून आरोग्य आपल्या दारी ही संकल्पना घेऊन काम करीत आहोत. तसेच आयुर्वेदाचा खेडोपाडी प्रसार व प्रचार करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. हे छत्तीसावे शिबिर असून आत्तापर्यंत सुमारे पंधरा हजाराच्या वर रुग्णांना याचा लाभ मिळाला आहे. यासाठी सर्वांचे सहकार्य मिळत आहे, असे सांगितले.

डॉ. राज सातपुते यांनी, कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागाबरोबरच शहरातही आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरांना प्रतिसाद मिळत असून आयुर्वेदाची खरी ओळख होत आहे. आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प केला आहे आणि तो प्रत्यक्षात उतरत असताना मनस्वी आनंद होत आहे, असे नमूद केले.

या शिबिरात डॉ. राज सातपुते यांच्यासह व्यवस्थापक डॉ. तेजस रणखांब, डॉ. प्राची चावडे, डॉ. ज्ञानदीपा ढवळे, डॉ. गीता बसंतवानी, डॉ. ध्रुव दमानिया, डॉ. तन्वी पटेल, आरोग्यसेविका आयेशा वाडकर, ज्योती कांबळे, कल्पना भानुशाली, रिशिता ओझा, कृष्णा जानवी, दिप्ती पाठारे, सुशील शर्मा, आदित्य जाधव, रश्मी भानुशाली, स्नेहल काळे, मीनाक्षी म्हात्रे, जागृती ठाकूर, प्रतिमा गुप्ता आदींनी आरोग्यसेवा दिली.

चामखीळ आणि भोवरी तत्काळ काढण्यात आली तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराच्या रुग्णांची चिकित्सा करून त्यांच्यावर उपचार सुरु केले. बहिरेपणा, सांधेदुखी, कंबरदुखी, गुढघेदुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. ३१० रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली. या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली.

या वेळी पांडुरंग देशमुख, प्रताप गीते, बळवंत घुमरे, फुटरमल ओसवाल, ज्योती पाटील, वसुधा ठाकूर, बिनिता घुमरे, यश सुर्वे, पद्मजा देशमुख, राजेश ओसवाल, अण्णा बैलमारे, वैशाली ठाकरे आदी उपस्थित होते.

# रोह्यात ३९ मोतीबिंदू रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी ८१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी डोळ्यात मोतिबिंदू आढळलेल्या ३९ रुग्णांना नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला, शंकरा आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. यासाठी प्रवासाची सोयसुद्धा विनामूल्य करण्यात आली.



रोहा सिटिझन फोरम आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. श्री धावीर मंदिर भक्त निवासात झालेल्या या ४३व्या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर झाले.

शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. प्रियदर्शिनी, प्रतिक्षा माने, सिद्धी मोरे, रुचिका जंगम, ओमकार पाटील, विश्वनाथ पाटील, ज्ञानेश्वर कांबळे यांनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरमने आयोजित केलेल्या शिबिरांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ३५००हून अधिक नेत्र रुग्णांना नवीन दृष्टी प्राप्त झालेली आहे. त्यामुळे शिबिरात तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, मिलिंद अष्टीवकर, श्रीकांत ओक, अहमद दर्जी, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, संतोष खटावकर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, बिलाल मोर्बेकर, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, राजेश काफरे, निलेश शिर्के, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, भावेश अग्रवाल आदी फोरमच्या सर्व सदस्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.


अध्यक्ष परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# धाकटी पंढरीत भाविकांची मांदियाळी; यात्रेलाही रंग

**खोपोली : प्रतिनिधी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीतील धाकटी पंढरीत कार्तिक शुध्द एकादशी निमित्ताने विठ्ठल रूखमाईच्या दर्शानासाठी पहाटेपासून भाविकांनी गर्दी केली होती.





पहाटे साडेचार वाजता या वर्षी महाआरती व पूजेचा मान मिळालेले माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील यांनी सपत्नीक विधिवत महापूजा व महाआरती झाल्यावर पाच वाजल्यापासून सर्वसामान्य भाविक व वारकऱ्यांसाठी मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. दिवसभरात हजारो वारकरी व सर्वसामान्य भाविकांनी कार्तिकी एकादशी योग निमित्ताने विठुरायाचे दर्शन घेतले.

खोपोली नगरपालिका हद्दीतील ताकई गावच्या परिसरात उंच टेकडीवर विठ्ठल रूखमाईचे मंदिर आहे. या ठिकाणी संत तुकाराम महाराज मिरीचा व्यवसाय करण्यासाठी येत असत. परिसरातील काही लोकांनी महाराजांचे पैसे बुडविल्याने त्यांनी देवाला विनंती केली असता, साक्षात पांडुरंगाने दर्शन देत बुडालेले पैसे परत मिळवून दिले. त्यामुळेच या मंदिराला बोंबल्या विठोबा मंदिर असे नाव पडले असल्याची अख्यायिका सांगितली जाते. शेकडो वर्षापासून कार्तिकी एकादशीला येथे मोठी यात्रा भरते. कार्तिकी एकादशी व यात्रेदरम्यान संपूर्ण जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त दर्शनासाठी येतात.

कार्तिका एकादशी आदल्या दिवशी भव्य पालखी सोहळा पार पाडतो. ताकई गावात घरोघरी पालखीचे दर्शनानंतर रात्री दोनच्या दरम्यानपालखी मंदिरात स्थानापन्न करण्यात आली. मंदिरात गर्दी न होता भाविकांना दर्शन घेण्यासाठी कोणतीही अडचण होऊ नये यासाठी धाकटी पंढरी देवस्थान कमिटीचे अध्यक्ष ए.जी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली देवस्थान कमिटी सर्व सदस्यांनी उत्तम व्यवस्था केली होती. खोपोली पोलिस ठाण्याचे निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनात बंदोबस्त चोख ठेवण्यात आला.

यात्रेनिमित्त खोपोली पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी पालिकेकडून आरोग्य यंत्रणा, अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवत अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

कार्तिकी एकादशीपासून सुरू होणारी यात्रा सतत पंधरा दिवस चालते. यात करोडो रुपयांची उलाढाल होऊन शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह होतो. दरम्यान, या वर्षी यात्रेत मोठ्या प्रमाणावर विविध व्यवसाय-धंदे, दुकाने, मनोरंजनाची, रोमहर्षक पाळणे व खेळणी दुकाने थाटली आहेत, पण यात्रेवर परतीच्या अवकाळी पाऊसाचे सावट मात्र कायम असल्याने व्यापारी व दुकानदारांच्या मनात चिंता आहे.

# पखवाद वादक हेमंत तांबोळींचे गुरूपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध पखवाज वादक हेमंत बुवा तांबोळी यांचे गुरुपूजन शिष्यांकडून करण्यात आले. कोलीवली गावात गुरुपूजन सोहळा त्यांच्या शिष्यांनी केला.



हेमंत तांबोळी यांनी वयाच्या सातव्या वर्षापासून पखवाद वादनाचे शिक्षण घेतले आहे. २०१३ मध्ये पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीमध्ये महाराष्ट्रातील लोककलांचे पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर पखवाद वादक, ढोलकी, दिमडी, संबळ या वाद्यांचे प्रसिद्ध वादक कृष्णा मुसळे, विजय चव्हाण या गुरूंकडून वादनाचे प्रशिक्षण घेतले. तांबोळी हे मुंबईतील मोठमोठ्या लोककला ग्रुपमध्ये वाद्य काम करत असतात. त्यांनी आतापर्यंत दूरदर्शन सह्याद्री, टीव्ही नाईन मराठी, लोकमत, महाराष्ट्र माझा, सोनी मराठी, कलर्स मराठी अशा अनेक टीव्ही चॅनेलवर लोककला कार्यक्रमांमध्ये वाद्य काम केले आहे. महाराष्ट्रच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर राजस्थानच्या उदयपूरमध्ये भारत सरकारच्या पश्चिम सांस्कृतिक केंद्रात लोकवाद्य काम केले आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टपैलू लोककलाकार योगेश चिकटगावकर यांच्या प्रसिद्ध भारुड सम्राज्ञी चंदाताई तिवाडी, बाजीराव मस्तानी फिल्म गायक गणेश चंदनशिवे यांना वादनाची साथ केली आहे.

अशा बिझी शेड्युलमधून वेळ काढत हेमंत तांबोळी हे नेरळ कशेळे भागातील स्थानिक तरुणांना पखवाज वादनाचे प्रशिक्षण देत असतात. त्यासाठी तांबोळी हे कोणत्याही विद्यार्थ्यांकडून मानधन स्वीकारत नाहीत आणि त्यामुळे दरवर्षी गुरुपूजन कार्यक्रम आयोजित करून आपल्या गुरुप्रती आदरभाव व्यक्त करीत असतात. या वेळी उपस्थित कलावंतांचा चक्रीभजनाचा कार्यक्रम झाला. कर्जत व अंबरनाथ तालुक्यातील कलावंत व मित्र परिवार उपस्थित होते.

# आयसीसीकडून वर्ल्डकप टीम जाहीर

## भारताच्या तीन खेळाडूंचा समावेश; हरमनप्रीत कौरला वगळले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीने महिला विश्वचषक २०२५च्या टीम ऑफ द टूर्नामेंटची घोषणा केली. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी पराभूत करत वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. या संघात विश्वविजेत्या भारत आणि उपविजेत्या दक्षिण आफ्रिकेच्या प्रत्येकी तीन खेळाडूंचा समावेश आहे. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिला सर्वोत्तम खेळाडूंच्या संघात स्थान देण्यात आलेले नाही.

भारताकडून सलामीवीर स्मृती मानधना, फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंट दीप्ती शर्मा यांचा समावेश करण्यात आला आहे, तर दक्षिण आफ्रिकेची कर्णधार



लॉरा वुल्व्हार्डचाही समावेश आहे. ७१.३७च्या सरासरीने ५७१ धावा करून विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिच्या नावावर आहे.

११ खेळाडूंच्या या संघात उपांत्य फेरीत पोहचलेल्या ऑस्ट्रेलियन संघातील तीन खेळाडूंचाही समावेश आहे. या तीन खेळाडू म्हणजे ॲनाबेल सदरलँड, ॲश गार्डनर आणि अलाना किंग आहेत. इंग्लंडच्या सोफी एक्लेस्टनला संघात स्थान देण्यात आले आहे, तर पाकिस्तानची सिद्रा नवाज ही बाद फेरी गाठण्यात अपयशी ठरलेल्या संघातून निवडलेली एकमेव खेळाडू आहे.

टीम ऑफ द टूर्नामेंटची कर्णधार म्हणून लॉरा वुल्व्हार्डची निवड करण्यात आली आहे. तिने दोन्ही बाद फेरीच्या सामन्यांमध्ये शतके झळकावली.

**असा आहे संघ**

स्मृती मानधाना (भारत), लॉरा वुल्व्हार्ड (दक्षिण आफ्रिका) (कर्णधार), जेमिमा रॉड्रिग्ज (भारत), मारिझान कॅप (दक्षिण आफ्रिका), ॲशले गार्डनर (ऑस्ट्रेलिया), दीप्ती शर्मा (भारत), ॲनाबेल सदरलँड (ऑस्ट्रेलिया), नदीन डी क्लार्क (दक्षिण आफ्रिका), सिद्रा नवाज (पाकिस्तान) (विकेटकीपर), अलाना किंग (ऑस्ट्रेलिया).

# आयसीसी क्रमवारीत उलथापालथ

## स्मृती मानधनाला धक्का, आफ्रिकेची लॉरा अव्वल स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा संपल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) महिलांची नवी एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली आहे. या नवीन क्रमवारीनुसार भारतीय सलामीवीर स्मृती मानधनाने अव्वल स्थान गमावले आहे. द. आफ्रिकेच्या संघाची कर्णधार लॉरा वोल्व्हार्ट हिने फलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकाचे विजेतेपद यंदा भारतीय संघाने पटकावले आहे. अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी नमवत पहिल्यांदाच चषकावर नाव कोरले. या विजयानंतर आयसीसीने महिलांची नवीन क्रमवारी जारी केली आहे.

या क्रमवारीत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आतापर्यंत पहिल्या क्रमांकावर असलेली भारतीय संघाची सलामीची फलंदाज स्मृती मानधना आता दुसऱ्या



स्थानावर घसरली आहे. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्व्हार्ट हिने पहिल्या क्रमांकाच्या खुर्चीवर कब्जा केला आहे. याव्यतिरिक्तही क्रमवारीत मोठी उलथापालथ झालेली दिसून येत आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघाची कर्णधार लॉरा वोल्व्हार्ट हिला भलेही आयसीसी महिला विश्वचषकाचे विजेतेपद मिळवता आले नाही, परंतु तिने अंतिम सामन्यात शतकी खेळी साकारली. ती एकटीच आपल्या संघासाठी मैदानात लढत राहिली होती. जोपर्यंत ती क्रीजवर टिकून होती, तोपर्यंत भारताचा विजय निश्चित झाला नव्हता, मात्र ती बाद होताच भारताने आपला विजय जवळपास पक्का केला होता.

उपांत्य सामन्यात इंग्लंडविरुद्धही लॉराने शतक झळकावले होते. तिच्या सलग दोन शतकानंतरही संघाला विश्वचषक जिंकता आला नसला, तरी तिने आयसीसी महिला एकदिवसीय क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आपले स्थान बळकट केले आहे.

क्रमवारीत लॉराने दोन स्थानांची झेप घेतली. आता तिचे रेटिंग ८१४ झाले आहे. यामुळेच भारताची स्टार खेळाडू स्मृती मानधनाचे एक स्थानने नुकसान झाले आहे. तिला आता दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे. स्मृतीचे रेटिंग आता ८११ आहे. विशेष म्हणजे, पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या खेळाडूंच्या रेटिंगमध्ये फारसा मोठा फरक नाही. ऑस्ट्रेलियाच्या ॲश्ले गार्डनरलाही एक स्थानाचा तोटा झाला असून ती ७३८ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर गेली आहे.

### ‘टॉप १०’मध्ये जेमिमाची एन्ट्री!

*या क्रमवारीतील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, उपांत्य फेरीत बलाढ्य ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक झळकावणारी भारताची मधल्या फळीतील फलंदाज जेमिमा रॉड्रिग्सने टॉप १०मध्ये यशस्वी प्रवेश केला आहे. जेमिमाने एकाच वेळी नऊ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. ती आता ६५८ रेटिंगसह १०व्या क्रमांकावर पोहोचली आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरलाही क्रमवारीत फायदा झाला आहे, तथापि ती अजूनही पहिल्या १० खेळाडूंमध्ये स्थान मिळवू शकलेली नाही. हरमनप्रीत चार स्थानांची झेप घेत ६३४ रेटिंगसह १४व्या क्रमांकावर पोहचली आहे.*



## एसटी महामंडळ रायगड विभाग क्रिकेट संघाचे शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) रायगड विभागाच्या क्रिकेट संघाचे पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या मैदानावर मंगळवारी (दि.४) निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन रायगड जिल्हा राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक सुहास चौरे यांच्या हस्ते झाले. या वेळी एसटी महामंडळ रायगड विभागाचे कामगार अधिकारी सुहास कांबळे, परिवहन महामंडळ रायगड विभागीय कार्यशाळेचे प्रभारक रवींद्र तांडेल, रायगड विभाग पेण कार्यालयाचे लिपीक रूपेश चांदोरकर, वाहन परीक्षक दिलीप पालवणकर, झुंझार युवक मंडळ पोयनाडचे सचिव किशोर तावडे, क्रीडा प्रमुख नंदकिशोर चवरकर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्य ॲड. पंकज पंडित, संघ सिलेक्टर अभिषेक खातू, प्रितम पाटील यांच्यासह परिवहन महामंडळ रायगड विभागाचे ४० खेळाडू निवड चाचणी शिबिरासाठी उपस्थित होते.

या निवड चाचणी शिबिरामधून एसटी महामंडळ रायगड जिल्ह्याचा क्रिकेट संघ निवडला जाणार आहे. हा संघ १८ नोव्हेंबरपासून जळगाव येथे होणाऱ्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

## कराटेपटू प्राची सिन्हाला सुवर्णपदक



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम.बी. मोरे फाऊंडेशन कला, वाणिज्य, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील प्राची मुकेश सिन्हा (बारावी विज्ञान) या विद्यार्थिनीने अलिबागमध्ये आयोजित जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे.

या स्पर्धेत प्राची हिने १९ वर्ष मुलींच्या वयोगटात सहभाग घेतला होता. स्पर्धेतील यशासह तिची विभागीय स्तर स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यासाठी तिला मास्टर मुकेश सिन्हा (शिवनेरी कराटे क्लास) यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले.

मोरे फाऊंडेशनचे अध्यक्ष, संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक आणि महाविद्यालय क्रीडा समितीच्या प्रमुख प्रा. ऋतुजा पवार आणि प्रा. मयूर पाखर यांनी प्राचीचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत घेण्यात येणाऱ्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी इशिता प्रशांत शिंदे हिने वुशू या खेळ प्रकारांमध्ये कांस्यपदक पटकावले आहे तसेच विद्यालयातील अजित राजेंद्र झिने आणि सलाउद्दीन जहीर पटेल या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल संस्थचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंद करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर उपस्थित होत्या.

विद्यालयातील अजित राजेंद्र झिने याची अहिल्यानगर येथे होणाऱ्या कुस्ती या खेळ प्रकारामध्ये राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सलाउद्दीन जहीर पटेल या विद्यार्थ्याचीदेखील वेटलिफ्टिंग या खेळ प्रकारामध्ये नाशिक मनमाड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी टीम इंडियाच्या जर्सीचे अनावरण




**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा २०२५साठी टीम इंडियाच्या अधिकृत जर्सीचे अनावरण इंडसइंड बँकेच्या सहयोगातून करण्यात आले. ही ऐतिहासिक स्पर्धा ११ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.

या अनावरण सोहळ्यास सीएबीआयचे अध्यक्ष, समर्थन ट्रस्टचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. महंतेश किवादासन्नवर, सीएबीआयचे अधिकारी, टीमच्या कर्णधार आणि उपकर्णधार, इंडसइंड बँकेच्या कार्यकारी उपाध्यक्ष आणि कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व प्रमुख मटिल्डा लोबो, स्पर्धेच्या अध्यक्ष मीनाक्षी लेखी, भारतातील श्रीलंकेच्या उच्चायुक्त महामहीम महिषिनी कोलोन तसेच टीम इंडियाचे समर्थक उपस्थित होते.

भारतीय महिला संघ हा जगातील पहिल्या दृष्टिबाधित महिला टी-२० विश्वचषकात देशाचे प्रतिनिधित्व करणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही स्पर्धा ११ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत नवी दिल्ली, बंगळुरू आणि कोलंबो येथे होणार असून ऑस्ट्रेलिया, भारत, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अमेरिका हे सात देश यात आपला खेळ दाखवतील.

## खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा

**खोपोली : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास त्याचप्रमाणे विक्रम साबळे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेचे आयोजन ६ ते ८ नोव्हेंबरदरम्यान खोपोलीतील काशी स्पोर्ट्स सेंटर (महाराजा मंगल कार्यालय) या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

याबाबतची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबळे, क्रीडा शिक्षक जगदीश मरागजे व राजाराम कुंभार यांनी दिली. शासनातर्फे ही खोपोलीकरांना पर्वणी असून या भव्य स्पर्धेचा नागरिकांनी आनंद घ्यावा, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

# मुंबई वि. राजस्थान संघ सामना अनिर्णित

## ▪ रणजी ट्रॉफीत संकटमोचक यशस्वी जैस्वालचे शतक



**जयपूर : वृत्तसंस्था**

रणजी करंडक स्पर्धेत राजस्थानविरुद्धच्या एलिट ग्रुप ‘डी’ सामन्यात मुंबईच्या संघावर डावाने पराभूत होण्याचे संकट घोंगावत होते. पहिल्या डावात अर्धशतकी खेळी करणाऱ्या यशस्वी जैस्वालने दुसऱ्या डावात दीडशतकी खेळी केली. या जोरावर चौथ्या दिवसाच्या खेळात मुंबई संघ सामना अनिर्णित राखून पराभव टाळण्यात यशस्वी ठरला.

जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर रंगलेल्या राजस्थानविरुद्धच्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना मुंबई संघाच्या यशस्वी जैस्वालने ९७ चेंडूत ६७ धावांची खेळी केली. त्याच्याशिवाय मुशीर खान याने केलेली ४९ धावांची खेळीवगळता अन्य कोणलाही बॅटिंगमध्ये धमक दाखवता आली नाही. परिणामी मुंबईचा पहिला डाव अवघ्या २५४ धावांत आटोपला. मग राजस्थानच्या संघाने दीपक हुड्डाचे २४८ (३३५) द्विशतक आणि कार्तिक शर्माच्या १३९ (१९२) शतकी खेळीच्या जोरावर पहिल्या डावात सहा बाद ६१७ धावा करत मुंबईच्या संघाला बॅकफूटवर ढकलले. राजस्थानकडे ३६३ धावांची भक्कम आघाडी होती, पण जैस्वालने मुंबईला तारले.

## दिव्यांग खेळाडूंसाठी आजपासून राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा

**मुंबई :** ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशन फॉर फिजिकली चॅलेंज्ड यांच्या वतीने शारीरिकदृष्ट्या दिव्यांग खेळाडूंसाठी आंतरराज्यीय एलआयसी ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान पोलीस जिमखाना, इस्लाम जिमखाना आणि हिंदू जिमखाना, मरीन लाइन्स, मुंबई येथे होणार आहे. या स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी होत आहेत. जम्मू-कश्मीर, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, सौराष्ट्र, बडोदा, महाराष्ट्र, मुंबई, कर्नाटक, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू, विदर्भ, झारखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा त्यात समावेश आहे.

# वर्ल्डकप विजेते कोच मुझुमदार यांचे राहत्या घरी जोरदार स्वागत

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय महिला संघ दक्षिण आफ्रिकेला नमवत वर्ल्ड चॅम्पियन ठरला. महिला वनडे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेला सर्वबाद करत ५२ धावांनी विजय मिळवला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली आणि कोच अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनासह भारतीय महिला संघाने या विश्वचषकावर आपले नाव कोरले. देशभरात जल्लोषाचे वातावरण असताना कोच मुझुमदार यांचे त्यांच्या राहत्या घरी जोरदार स्वागत झाले आहे.

भारतीय संघाचे कोच अमोल मुझुमदार यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन या विश्वचषक विजयात फार मोलाचे ठरले. ऑस्ट्रेलियाविरूद्ध सेमीफायनलमध्ये भारताने वर्ल्ड रेकॉर्ड रचत विजय मिळवला. या सामन्यातील पहिल्या डावानंतर ड्रेसिंग रूममध्ये फळ्यावर एक वाक्य लिहिले होते की, तुम्हाला फक्त ऑस्ट्रेलियापेक्षा एक धाव जास्त करायची आहे. वाक्य साधे आहे, पण त्याचा परिणाम खूप मोठा होता. सातत्याने संघाला मार्गदर्शन करणे, त्यांचा आत्मविश्वास ढासळू न देणे यामागे सर्वात मोठे योगदान मुझुमदार व त्यांच्या सपोर्ट स्टाफचे आहे.

डी.वाय. पाटीलच्या मैदानावर झालेल्या सामन्यानंतर कोच अमोल मुझुमदार ३ नोव्हेंबरला संध्याकाळी पार्ल्यातील त्यांच्या घरी परतले. यादरम्यान त्यांच्या सोसायटीतील लोकांनी त्यांना मोठे सरप्राईज देत स्वागत केले, ज्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. टीम इंडियाचा कबीर खान अशी उपमा त्यांना दिली जात आहे.

मुझुमदार त्यांच्या कारने जेव्हा सोसायटीमध्ये येत होते तेव्हा ढोल, तुतारी वादनाने त्यांचे स्वागत करण्यात आले. पुष्पवर्षाव करून घोषणा दिल्या गेल्या. यानंतर बॅटने गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

# आशिया कप रायझिंग स्टार्स टी-२० स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रिकेट परिषदेच्या आशिया कप रायझिंग स्टार्स टी-२० स्पर्धेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर टीम इंडियाच्या ताफ्यात असलेल्या जितेश शर्माकडे भारतीय ‘अ’ संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात जितेश शर्माला संजू सॅमसनच्या जागी प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली होती. या दौऱ्यावरून परतल्यार तो कतार येथील दोहा येथे रंगणाऱ्या स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसेल.

आशिया कप रायझिंग स्टार्स



टी-२० स्पर्धेसाठी निवडलेल्या भारतीय ‘अ’ संघात १४ वर्षीय युवा बॅटर वैभव सूर्यवंशी यालाही संघात संधी देण्यात आली आहे. भारतीय ‘अ’ संघाकडून युवा बॅटरसाठी ही पहिली मोठी स्पर्धा असेल. आयपीएलनंतर वैभव सूर्यवंशी याने ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड दौऱ्यात धमाकेदा कामगिरी करून दाखवली आहे. छोट्या फॉरमॅटमध्ये मोठा धमाका करण्यासाठी माहिर असलेला वैभव या दौऱ्यात प्रियांश आर्य याच्या साथीने डावाची सुरुवात करताना पहायला मिळू शकते. १४ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीत वेस्ट एंड आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दोहा येथी ही स्पर्धा रंगणार आहे.

### जितेश शर्माकडे नेतृत्व; वैभव सूर्यवंशीला संधी

भारतीय संघ : प्रियांश आर्य, वैभव सूर्यवंशी, नेहल वढेरा, नमन धीर (उप-कर्णधार), सूर्यांश शेडगे, जितेश शर्मा (कर्णधार), रमनदीप सिंह, हर्ष दुबे, आशुतोष शर्मा, यश ठाकुर, गुरजापनीत सिंह, विजय कुमार वैश्य, युद्धवीर सिंह, अभिषेक पोरेल (विकेटकीपर), सुयश शर्मा; राखीव खेळाडू गुरनूर बराड, कुमार कुशाग्र, तनुश कोटियन, समीर रिझवी, शेख रशीद.

### भारत-पाक महामुकाबला

आशिया कप स्पर्धेत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघाने तीन वेळा पाकस्तानचा पराभूत केले होते. फायनलमध्ये पाकला पराभूत करूनच टीम इंडियाने दुबईत आशिया कप स्पर्धेतील आपला दबदबा कायम ठेवला होता. त्यानंतर महिला वर्ल्ड कप स्पर्धेतही भारतीय महिला संघाने पाकिस्तानला पराभवाचा धक्का दिला आता जितेश शर्माच्या नेतृत्वाखालील संघ पुन्हा पाकविरुद्ध भिडणार असून निकाल आधी लागला तसाच पहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे. या स्पर्धत १६ नोव्हेंबरला भारत-पाक यांच्यातील लढत नियोजित आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com